RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१७३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.३ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## 'ढेकणाला आव्हान देत नाही', उद्धव ठाकरेंची पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीसांवर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३पुणे**

दोन दिवसांपूर्वी मुंबईतल्या सभेत बोललो की, एक तर तू राहशील किंवा मी राहिल. माझ्या पायाशी कलिंगड ठेवलेलं होतं. त्यामुळे काही जणांना वाटलं मी त्यांना आव्हान दिलं. मी कोणत्याही ढेकणाला आव्हान देत नाही. मी म्हणजे कोण आणि तू म्हणजे कोण? याची संकल्पना उद्धव ठाकरे यांनी सांगितली. मी म्हणजे माझा संस्कारी महाराष्ट्र आणि तू म्हणजे महाराष्ट्रावर दरोडे टाकणाऱ्या दरोडेखोरांचा पक्ष. ढेकणाला कधी आव्हान दिलं जात नाही, ढेकणं चिरडायची असतात. कुणीतरी हे आव्हान स्वतःवर घेतलं. त्यानं सांगितलं माझ्या नादाला लागू नका. मी म्हणतो, तुझ्या नादाला लागण्याएवढ्या किंमतीचा तू नाहीच आहेस, अशी टीका शिवसेना उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली.

आज पुण्यामध्ये उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्या पुण्यातील पदाधिकाऱ्यांचा मेळावा संपन्न झाला. यावेळी त्यांनी भाजपावर पुन्हा एकदा टीकास्त्र सोडले. बऱ्याच वर्षांनंतर मी पुण्यात येत आहे. यापुढे लढाई मैदानात होणार, हॉलमध्ये होणार नाही, असेही आव्हान त्यांनी यावेळी दिले.



उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, काही दिवसांपूर्वी पुण्यात भाजपाचा एक कार्यक्रम झाला. इतिहासात आपण डोकावलं, तर शाहिस्तेखान जरा तरी हुशार होता, असं म्हणावं लागेल. त्याचं बोटावर निभावलं. तीन बोटं कापली गेल्यानंतर पुन्हा महाराष्ट्रात नाही आला. त्यातनं काही शहाणपण यांनी घेतले असते तर परत महाराष्ट्रात आले नसते, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी अप्रत्यक्षरित्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका केली.

पण ते (अमित शाह) परत का आले? तर महाराष्ट्राच्या जनतेने दिलेल्या फटक्यांचे वळ कुणाकुणाच्या अंगावर उमटले. हे पाहण्यासाठी ते आले. अहमदशाह अब्दालीचा राजकीय वंशज हा पुण्यात आला होता. तो अहमद शाह होता आणि हे अमित शाह आहेत. अहमद शाहचा राजकीय वर्शंच इथे वळवळायला आला होता. नवाज शरीफचा केक खाणाऱ्यांकडून आता आम्ही हिंदुत्व शिकायचं का? शिवसेनेने हिंदुत्व सोडल्याचे हे म्हणाले. आम्ही हिंदुत्व सोडलेलं नाही. शंकराचार्यांनी म्हटल्याप्रमाणे विश्वासघातकी लोक हिंदू असू शकत नाही. तुम्ही आमच्याशी विश्वासघात केला, असे टीकास्त्र उद्धव ठाकरेंनी सोडलं.

आम्ही काँग्रेसशी आघाडी केली तर हिंदू विरोधी होतो का? मग तुमचे राजकीय बाप श्यामाप्रसाद मुखर्जी मुस्लीम लीगबरोबर मांडीला मांडी लावून का बसले होते? जम्मू-काश्मीरमध्ये मेहबुबा मुफ्ती यांच्याबरोबर सरकार स्थापन केले होते. आजही चंद्राबाबू नायडू यांच्याशी आघाडी केली. नायडू हे काय हिंदुत्ववादी आहेत का? नितीश कुमार हिंदुत्ववादी आहेत का? त्यांच्याकडे डोळेझाक करून आमच्यावर टीका करता, असाही सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

## देवेंद्र फडणवीस मैदानात उतरले तर तुमचं वस्त्रहरण होईल

## नितेश राणेंचा महाविकास आघाडीला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ मुंबई**

राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझेंनी पुन्हा एकदा आरोप केले आहेत. त्यामुळे राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. अनिल देशमुख हे पीएच्या माध्यमातून पैसे घ्यायचे. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना पत्र लिहून सर्व माहिती दिल्याचं सचिन वाझे म्हणाले आहेत. दरम्यान, त्यांनी राष्ट्रवादी काँगेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांचही नाव घेतलं आहे.त्यामुळे या प्रकरणाला वेगळच वळण लागल्याची शक्यता आहे. दरम्यान, यावार आता भाजप आमदार नितेश राणे यांनी जोरदार घणाघात केलाय.



सचिन वाझे यांनी केलेल्या आरोपावर नितेश राणे यांनी, 'सचिन वाझे महाविकास आघाडीचा कलेक्शन एजंट होते. सचिन वाझे यांनी सत्य विधान केलंय. सत्य बोलायला सचिन वाझेंनी बोलायला सुरुवात केली आहे. अनिल देशमुख यांनी हिंमत असेल तर समोर येऊन खुलासा करावा. सगळ्या गोष्टीची खुलासा करण्याची हिंमत अनिल देशमुख यांनी करावी, असं आव्हान नितेश राणे यांनी अनिल देशमुखांना दिले आहे.

सचिन वाझे यांना दिशा सालियान आणि सुशांत सिंग राजपूत यांच्या खुनासंदर्भातही माहिती आहे. सचिन वाझे जसं जसं बोलत जातील, तसं तसं महाविकास आघाडीचं वस्त्रहरण होईल असा थेट प्रहार राणे यांनी केला आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी मेळाव्याला शिवसंकल्प नाव नाही तर अली संकल्प मेळावा नाव ठेवावं असा चिमटाही राणे यांनी यावेळी ठाकरे यांना काढला. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे महाविकास आघाडीतील सर्वांच्या कुंडल्या आहेत. फडणवीस मैदानात उतरले तर सर्वांचं वस्त्रहरण होईल, असा इशाराही नितेश राणे यांनी यावेळी दिला आहे.

## ४० जिवंत काडतुसे, तलवार व वाघनख...

## युवा सेना जिल्हाप्रमुखाच्या घरून शस्त्रसाठा जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ चंद्रपूर**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युवासेना चंद्रपूर जिल्हा प्रमुख विक्रांत सहारे याच्या इंदिरा नगर येथील निवासस्थानी रामनगर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत सहारे याच्या घरातून ४० जिवंत काडतुसे, तलवार, वाघनख जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. गेल्या महिनाभरात जिल्ह्यात गुन्हेगारीने डोके वर काढले आहे. यावरून पोलीस विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रचंड टीका होत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी आता धडक कारवाईला सुरुवात केली आहे.



युवा सेना जिल्हाध्यक्ष विक्रांत सहारे असे आरोपीचे नाव आहे. ही कार्यवाही शुक्रवारी मध्यरात्री रामनगर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिसांनी केली. जुलै महिन्यात चंद्रपुरात गोळीबाराच्या घटनांनी थरार उडाला आहे. गोळीबारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे भयावह चित्र जिल्ह्यात निर्माण झाले आहे. दोन दिवसांपूर्वी कंबरेला देशीकट्टा लावून फिरणाऱ्या युवकाला पोलिसांनी अटक केली होती. गुन्हेगारांकडे सापडणाऱ्या शस्त्रसाठ्यामुळे शहरवासी भयभीत झाले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, शहरातील बाबूपेठ येथील निलेश पराते, मनोज कुलटवार हे दोघे इंदिरा नगरातील विक्रांत सहारे यांला शस्त्र विक्री करण्यासाठी येणार असल्याची गुप्त माहिती रामनगर पोलिसांना मिळाली. या माहितीचा आधारावर पोलिसांनी सापळा रचला. दोघे घरी पोहताच पोलिसांनी छापा घातला. घरातून चाळीस जिवंत काडतूस,तलवार सापडली. वाहनाची तपासणी केली असता त्यात वाघनख सापडले. पोलिसांनी आरोपीना ताब्यात घेतले आहे. विक्रांत सहारे हे युवासेनेचे उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख आहेत. सहारे यांच्या अटकेमुळे जिल्ह्यातील राजकारणात खळबळ उडाली आहे. दरम्यान जिल्ह्यातील अनेक राजकारणी शास्त्र बाळगत असल्याने येत्या काळात पोलिस विभागाच्या रडारवर त्यांची नावे देखील आहेत.जुलै महिन्यात मनसे कामगार सेना प्रमुख अमन अंधेवार यांच्यावर रघुवंशी संकुलात गोळीबार झाला होता. या गोळीबारात अंधेवार गंभीर जखमी आले होते. त्यानंतर बल्लारपूर शहरात कापड व्यवसायी अभिषेक मालू यांच्या दुकानात पेट्रोल बॉम्ब टाकण्यात आला होते. तेव्हा मालू यांना धमकवण्यासाठी बंदुकीचा वापर केला गेला. तर राजुरा येथे गोळीबारात सिंह यांची हत्या करण्यात आली. दरम्यान या सर्व घटना बघता जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी बंदूक, देशीकट्टा, तलवार वापरणाऱ्या विरुद्ध कारवाई सुरू केली आहे. याच कारवाईतून आतापर्यंत २२ गुन्हेगारांवर हद्दपरीची कारवाई केली आहे. येत्या काळात ही कारवाई आणखी तीव्र होणार आहे.

## राज ठाकरें पाठोपाठ शरद पवारांनी घेतली मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट; कारण काय?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३मुंबई**

आज सकाळी पहिल्यांदा महाराष्ट्र नव निर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा बंगल्यावर भेट घेतली. त्यांच्या भेटीत मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास, पोलीस वसाहतींचा पुनर्विकास, घरांची उपलब्धता यासह आधी विषयावर चर्चा झाल्याचे सांगण्यात येत आहे. ठाकरे यांच्या भेटीनंतर काही वेळातच वर्षा बंदल्यावर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेटी घेतली आहे. या भेटीचे कारण अजूनही समोर आलेले नाही.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शरद पवार यांचं पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आज मुख्यमंत्री शिंदे यांची पाठोपाठ दोन बड्या नेत्यांनी भेट घेतली आहे. खासदार शरद पवार या भेटीत मराठा आरक्षणासह राज्यातील अन्य विषयावर चर्चा करतील असं बोललं जात आहे. शरद पवार दुपारी २ वाजता वर्षा निवासस्थानी दाखल झाले आहेत. या भेटीत मराठा आरक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चा केली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आठवड्याभरात ही दुसरी भेट आहे. या आधी २२ जुलैला भेट घेतली होती.

शरद पवार यांनी २२ जुलै दिवशी घेतलेल्या भेटीत मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा विषय होता. यासोबतच दूध दराचाही प्रश्न, विरोधी पक्षातील नेत्यांच्या कारखान्याला कर्ज न देणे हा विषय होता. शरद पवार मुख्यमंत्री भेटीत कुणाच्या ही कारखान्यावर अन्याय होणार नाही असं आश्वासन दिलं होतं. दरम्यान, आता आजची भेट नेमकी कोणत्या कारणासाठी आहे याची माहिती अजूनही समोर आलेली नाही.

**राज ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट**

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली मनसेच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. यावेळी मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास, पोलीस वसाहतींचा पुनर्विकास, घरांची उपलब्धता विविध विषयांवर बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी राज्य प्रशासनातील वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

## २०२० मध्ये पुन्हा सचिन वाझेला कोणी नोकरीत घेतलं...; प्रसाद लाड यांचा अनिल देशमुखांना सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

मुंबई पोलिसातील निलंबित अधिकारी सचिन वाझे यांनी आज माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले. 'देशमुख हे पीए मार्फेत पैसे घेत होते' असा गौप्यस्फोट सचिन वाझे यांनी केला. यावरुन आता राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. दरम्यान, अनिल देशमुख यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करत वाझे यांचे हे आरोप म्हणजे फडणवीस यांची नवीन चाल असल्याचे सांगत टीका केली. या टीकेला आता भाजपा नेते आमदार प्रसाद लाड यांनी प्रत्युत्तर दिले.



आमदार प्रसाद लाड म्हणाले, अनिल देशमुखजी तुमची पत्रकार परिषद पाहिल्यानंतर एक प्रकर्षाने जाणवते की खोट बोला पण रेटून बोला. आपलेच दात आणि आपलेच ओठ, ज्या पद्धतीने आज अनिल देशमुख यांनी सांगितले की गुन्हेगारेचे स्टेटमेंट ग्राह्य धरले जात नाही. पण, या गुन्हेगाराला नोकरीत घेतले काणी? २००३ च्या खून प्रकरणात वाझेंना काढलं. त्या वाझेला २०२४ नंतर नोकरीत घेण्यासाठी कोणी प्रयत्न केले. पाठपुरावा कोणी केला? ज्या उद्धव ठाकरेंनी नोकरीत घ्या म्हणून सांगितलं पण फडणवीस यांनी याला विरोध केला. त्याला तुम्ही नोकरीत घेतलं. त्यानंतर शंभर कोटींची वसुली असेल, जिलेटीनचे प्रकरण असेल, मनसुख हिरेन हत्या असेल अशा अनेक प्रकरणात ज्या वाझेचा हात होता त्या वाझेला आशीर्वाद कोणाचा होता?, असा सवालही आमदार प्रसाद लाड यांनी केला.

आता तुम्ही म्हणताय एका आरोपीचे स्टेटमेंट ग्राह्य धरली जात नाही, अहो देशमुख वाझेंना परत नोकरीस घेण्याच काम तुमच आणि उद्धव ठाकरे, शरद पवारांचं होतं. आता तुम्हीच टीव्हीवर येऊन सांगता की आरोपीचे स्टेटमेंट ग्राह्य धरली जाऊ नये. ज्या वाझेंना मातोश्रीवर शिवसेनेत प्रवेश दिला ते संजय राऊतही असंच सांगत आहेत. यांनी स्वत:ची नैतिकता संपवली आहे. सरकारचा वापर मुंबईतून पैसे गोळा करण्यासाठी केला, असा आरोपही आमदार प्रसाद लाड यांनी केला.

## अनिल देशमुख पीएमार्फत पैसे घ्यायचे, फडणवीसांना मी एक...; सचिन वाझेच्या आरोपांनी खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती मुंबई**

माजी गृहमंत्री अनिल देशमुख हे गेल्या काही दिवसांपासून त्यांनी केलेल्या आरोपांमुळे चर्चेत आहेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस माझ्यावर दबाव आणून उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना तुरुंगात टाकणार होते असा गंभीर आरोप अनिल देशमुख यांनी केला होता. देवेंद्र फडणवीस यांच्यावर खोटं प्रतिज्ञापत्र देण्यासाठी दबाव टाकल्याचाही आरोप अनिल देशमुख यांनी केला होता. अशातच आता मुंबईचे बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझेने माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर धक्कादायक असे आरोप केले आहेत. अनिल देशमुख हे त्यांच्या पीएमार्फत पैसे घ्यायचे, असे सचिन वाझेने म्हटलं आहे.

मुंबई पोलीस दलातून बडतर्फ केलेले पोलीस अधिकारी सचिन वाझेने पुन्हा एकदा खळबळजनक गौप्यस्फोट केला. सचिन वाझेनी अनिल देशमुखांवर गंभीर आरोप केले आहेत. अनिल देशमुख पैसे घ्यायचे याचे सीबीआयकडे पुरावे असल्याची माहिती सचिन वाझेने दिली आहेत. देशमुख पीएच्या माध्यमातून पैसे घ्यायचे असा आरोप वाझेने केला.

जे काही घडलं आहे त्याचे सर्व पुरावे आहेत. ते (अनिल देशमुख) त्यांच्या पीएच्या माध्यमातून पैसे घ्यायचे. याबाबत 'सीबीआय'कडेही पुरावे आहेत. मी देखील गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांना एक पत्र लिहिलं आहे. हे सर्व प्रकरण (अनिल देशमुख) त्यांच्या विरोधात गेलेलं आहे. तसेच मी या प्रकरणात नार्को टेस्ट करायलाही तयार आहे. मी एक लेटर लिहिलं आहे, त्यामध्ये जयंत पाटील यांचंही नाव आहे, असे सचिन वाझेने म्हटलं आहे.



## देवेंद्र फडणवीस यांची नवी चाल...; सचिन वाझेंच्या आरोपावर अनिल देशमुखांचे प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ नागपूर**

गेल्या काही दिवसापासून माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. दरम्यान, आज मुंबई पोलिसातील निलंबित पोलिस अधिकारी सचिन वाझे यांनी देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले. अनिल देशमुख पीए मार्फत पैसे घ्यायचे असा आरोप वाझे यांनी केला आहे. यावरुन आता आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. या आरोपाला आता अनिल देशमुख यांनी प्रत्युत्तर दिले.

सचिन वाझे यांच्या आरोपांवर बोलताता अनिल देशमुख म्हणाले, 'मी चार दिवसापूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप केले होते, तीन वर्षापूर्वी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना तुरुंगात टाकण्यासाठी कशापद्धतीने ॲफिडेव्हीट मी करून द्यावं हा प्रस्ताव आला होता, याची वस्तुस्थिती मी जनसेसमोर आणली होती. त्यानंतर आता फडणवीस यांची ही नवीन चाल आहे, असा आरोपही अनिल देशमुख यांनी फडणवी यांच्यावर केला. 'देवेंद्र फडणवीस यांना बहुतेक माहित नाही, मुंबई हायकोर्टाने हे सांगितलं आहे की, सचिन वाझे गुन्हेगारीतील आहे. त्याची गुन्हेगारीची पार्श्वभूमी आहे. त्याच्या कोणत्याही स्टेटमेंटवर विश्वास ठेवण्यालायक नाही, असं हायकोर्टाने म्हटले आहे. अशा व्यक्तीच्या माध्यमातून फडणवीस यांनी माझ्यावर आरोप केले आहेत, असंही देशमुख म्हणाले.

सचिन वाझेच्या माध्यमातून माझ्यावर आरोप केले जात आहेत. त्याच्या कोणत्याही स्टेटमेंटवर विश्वास ठेवता येणार नाही असं हायकोर्टाने म्हटले आहे, असंही माजी गृहमंत्री अनिल देशमुख म्हणाले.

## संपादकीय ......

# चर्चा अजित पवारांच्या पक्षाची

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना भेटण्यासाठी आपण तेव्हा वेषांतर करून जात होतो, तोंडावर मास्क व डोक्यावर टोपी घालून आपण विमान प्रवास केला, असा गौप्यस्फोट स्वत: उपमुख्यमंत्री अजित पवारांनीच आपल्या दिल्ली भेटीत केला. दुसरीकडे तुम्हाला अपात्र का ठरवू नये, अशी विचारणा करणारी नोटीस सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार यांच्या पक्षाला दिली आहे. म्हणूनच न्यायालयाच्या निकालानंतर व विधानसभेच्या निवडणुकीनंतर अजित पवार यांच्या पक्षाचे भवितव्य काय, याची राजकारणात मोठी उत्सुकता आहे. ठाकरे सरकार हटवून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होऊन दोन वर्षं उलटली. गेल्या वर्षी जून महिन्यात अजित पवारांनी त्यांच्या काकांच्या विरोधात बंडाचा झेंडा फडकावला आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४१ आमदारांसह ते महायुतीत सामील झाले. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर राज्यात अनेकांना, झाले ते बरे झाले असे काही काळ वाटले. पण अजित पवारांनी शरद पवारांना आव्हान देण्याचे जे धाडस दाखवले, त्याबद्दल अनेकांना आश्चर्य वाटले. काकांनी ज्यांना राजकारणात मोठे केले, सत्तेच्या पदांवर संधी दिली, मग पुतण्याने त्यांच्याविरोधात बंड का करावे? या प्रश्नाने अनेकांची मती गुंग झाली. भाजपाने त्यांना बरोबर घेण्याची गरजच काय होती, या प्रश्नानेही राज्यात काहूर निर्माण झाले. भाजपा श्रेष्ठींचे आशीर्वाद व संरक्षण असल्याशिवाय शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन ताकदवान प्रादेशिक पक्षात उभी फूट पडणे शक्यच नव्हते. ज्यांनी या बंडाचे नेतृत्व केले, त्यांचे भाजपाने भले केले. एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपवून नव्या मित्रांचा आपण कसा सन्मान करतो हा संदेश भाजपाने देशभर दिला. अजित पवार यांचेही भाजपाने लाल गालिचा घालून स्वागत केले. त्यांना महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्रीपद दिले व प्रतिष्ठेचे समजले जाणारे अर्थ मंत्रालयही सोपविण्यात आले. अजितदादांच्या बरोबर सरकारमध्ये आलेल्या छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, धनंजय मुंडे, आदिती तटकरे, हसन मुश्रीफ, संजय बनसोडे, धर्मरावबाबा अत्राम आदी मंत्र्यांना महत्त्वाची खाती देण्यात आली. शरद पवारांना शह देण्यासाठीच भाजपाने अजितदादांना ताकद दिली हे काही लपून राहिलेले नाही.

गेल्या निवडणुकीत अजित हे त्यांच्या पुत्राला मावळमधून निवडून आणू शकले नव्हते, यंदा पत्नीला बारामतीतून निवडून आणू शकले नाहीत. नंतर आठवडाभरातच पत्नीला राज्यसभेवर खासदार म्हणून त्यांनी बिनविरोध पाठवले. महाराष्ट्राचे सत्ताकारण हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याभोवती फिरत आहे. यात अजित पवार कुठे आहेत? अजित पवार हे कुशल प्रशासक, रोखठोक बोलणारे, दिलेली वेळ अचूक पाळणारे, काम होणार असेल तर होणार आणि नसेल होणार तर नाही असे स्पष्ट सांगणारे, कार्यकर्त्यांसाठी उपलब्ध असणारे, लोकांमध्ये - गर्दीमध्ये मिसळणारे आणि आपल्याकडून झालेली चूकही मिष्किलपणे सांगणारे अशी त्यांची प्रतिमा आहे. मग लोकसभा निवडणुकीत ते व त्यांचा पक्ष कुठे कमी पडला? ते प्रचारासाठी जास्त काळ बारामतीत गुंतून राहिल्याने पक्षाच्या अन्य उमेदवारांना वेळ देऊ शकले नाहीत का? अजित पवार यांचा स्वभाव कोणाच्या पुढे - पुढे करणारा नाही, आपल्या भाषणात ते वरिष्ठांवर उगीचच स्तुतिसुमने उधळताना दिसत नाहीत. काकांच्या बरोबर असतानाही ते शरद पवारांच्या नावाची माळ ओढत नव्हते, आता भाजपाबरोबर आलेत म्हणून मोदी-शहांच्या पुढे-पुढे करताना दिसत नाहीत. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजपा किंवा संघ परिवारातून जे नाराजीचे सूर उमटले, त्यात अजित पवार व राष्ट्रवादी काँग्रेसला भाजपाने कशाला बरोबर घेतले, असा आक्षेप ध्वनित झाला. लोकसभा निवडणुकीतील अपयशाची कसर अजित पवारांना विधानसभा निवडणुकीत भरून काढायची आहे. राज्यात येत्या ऑक्टोबर महिन्यात विधानसभा निवडणूक अपेक्षित असल्याने महायुतीत जागा वाटपावरून आतापासूनच दावे करण्यास सुरुवात झाली आहे. अजित पवारांच्या वाट्याला किती जागा येणार व महायुतीत त्यांच्या पक्षाला किती महत्त्व दिले जाणार हा कळीचा मुद्दा आहे. जागा वाटपात पक्षाला भरीव वाटा मिळावा यासाठीच त्यांनी अमित शहांकडे आग्रह धरला आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीतीतील वाटपात ८० ते ९० जागा राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाव्यात असा पक्षांतर्गत दबाव आहे. जागा वाटपात सर्वाधिक जागा भाजपा लढवणार हे निर्विविवाद आहे. भाजपा १५० ते १६० जागा लढवू शकेल असा अंदाज आहे. उर्वरित जागा शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस यांना वाटून दिल्या जातील. एकनाथ शिंदे यांच्या पक्षातूनही १०० जागांची मागणी पुढे रेटली जात आहे.

लोकसभा निवडणुकीच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पवारांचा उल्लेख भटकती आत्मा असा केला होता. आता अमित शहा, पवारांना भ्रष्टाचाऱ्यांचे म्होरके म्हणालेत. अशा वक्तव्यातून शरद पवारांना सहानुभूती मिळू शकते व त्याचा परिणाम महायुतीवर होऊ शकतो. भाजपाबरोबर आल्यामुळे अजित पवार काहीसे बदलले आहेत. यंदा त्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात तुकोबाचा अभंग आहे. व्हीडिओ क्लिपच्या माध्यमातून संपर्कही चालू आहे. आपल्यावर झालेला एकही आरोप सिद्ध झाला नाही, हा संदेश लोकांपर्यंत पोहोचवत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे सर्व श्रेय मुख्यमंत्र्यांना मिळते हे वास्तव आहे. पण अजितदादांनी संवाद लाडक्या बहिणींसोबत, हा कार्यक्रम घेऊन आपला वाढदिवस साजरा केला.




## ड्रायफ्रूट्स दुधात भिजवावेत की पाण्यात? तज्ज्ञ सांगतात, सुकामेवा भिजवून खाण्याची योग्य पद्धत...

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक १**




'ड्रायफ्रुट्स खाणे' हे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असते. लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सगळ्यांनाच ड्रायफ्रुट्स खाणे फायदेशीर असते. साधारणपणे काजू, बदाम, बेदाणे, पिस्ता, खजूर, मनुका हे ड्रायफ्रुट्स जास्त प्रमाणात खाल्ले जातात. ड्रायफ्रुट्स खाणे भरपूर प्रमाणात पोषक असल्याने ते शरीराला ऊर्जा देतात. अनेकजणांना ड्रायफ्रुट्स भिजवून खाण्याची सवय असते. तर अनेकांना ते कोरडे खायला आवडतात. ड्रायफ्रुट्समध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि अनेक प्रकारचे पोषक घटक आढळतात, जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात,सकाळी उपाशी पोटी ड्रायफ्रुटस खाल्ल्याने शरीराला अनेक पोषक तत्वे मिळतात. याचबरोबर दिवसभर काम करण्याची ऊर्जा मिळते. ड्रायफ्रुट्स शरीराला झटपट ऊर्जा देतात.

**१. ड्रायफ्रूट्स दुधात भिजवून खाण्याचे फायदे-** न्यूट्रिशनिस्ट सिमरन सांगतात की, जर तुम्हाला ड्रायफ्रुट्स अर्ध्या ते एका तासांत खायचे असेल तर ते दुधात भिजवून खाणे फायदेशीर ठरते.

**२. ड्रायफ्रुट्स पाण्यात भिजवून खाण्याचे फायदे-** तज्ज्ञांच्या मते, ड्रायफ्रूट्स पाण्यात भिजवल्यास त्यातील फायटिक सिडचे प्रमाण कमी होते. फायटिक ॲसिड पोटासाठी हानिकारक ठरू शकते.

मुलांना पालेभाज्या आवडत नाहीत, सतत नाकं मुरडतात? ६ सोप्या ट्रिक्स- मुलं आनंदानं खातील पालेभाज्या...

**३. ड्रायफ्रूट्स नेमके कशात भिजवून खावेत ?** - ड्रायफ्रुट्स पाण्यात भिजवून खावेत की दुधात भिजवून खावेत, हे प्रत्येकाच्या गरजेवर अवलंबून असते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. ज्या लोकांना मधुमेह किंवा इतर कोणताही आजार आहे त्यांना जर ड्रायफ्रूट्स नेहमी खायचे असतील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच ते खावेत.

ड्रायफ्रूट्स भिजवून खाण्याचे फायदे :-

१. आपण अनेकदा भिजवलेले बदाम खातो. बदामाच्या सालीमध्ये टॅनिन असते जे पोषक तत्वांचे शोषण रोखते. बदाम भिजवून खाल्ल्याने त्याची साल वेगळी होते. त्यामुळे बदाम भिजवून खावेत असा सल्ला दिला जातो.

२. मनुका शक्यतो थेट खाल्ला जातो. परंतु तुम्ही जर ते भिजवून खाल्ले तर त्यात असलेले हानिकारक प्रिझर्व्हेटिव्ह निघून जातात आणि तुमच्या आरोग्याला त्रास होत नाही.

३. अक्रोड बदाम हे उष्ण असतात. त्यामुळे उन्हाळ्यात ते खाल्ल्याने नुकसान होऊ शकते. त्यामुळे पाण्यांत भिजवल्याने त्याची उष्णता विरघळते.

४. काही ड्रायफ्रूट्स अनेक दिवस भिजवून ठेवल्यास त्यांना अंकुर फुटू लागतात, त्यामुळे या गोष्टींचे पोषणमूल्य वाढते

# लिंबूवर्गीय फळांत देशात प्रथमच टँगो पेटंट वाणांची आयात, काय आहेत वाणाची वैशिष्ट्ये

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ कृषी विशेष**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

अनोखी चव, आकार, गंध, रंग, उत्पादकता या बाबतीत जगभरातील शेतकरी व ग्राहकांमध्ये मागणी असलेले वैशिष्ट्यपूर्ण पेटंट संत्रा वाण 'टँगो' भारतात आयात करण्यात आले आहे. राज्यातील लिंबू वर्गीय शेतीचा चेहरामोहराच यामुळे बदलणार आहे. 'सह्याद्री फार्म्स' या शेतकरी उत्पादक कंपनीच्या प्रयत्नांतून या वाणांची आयात करण्यात आली आहे. सध्या त्यावर क्वारंटाईन प्रक्रिया सुरु आहे.

सह्याद्री फार्म्सने या आधी द्राक्षांचे पेटंट वाण यशस्वीरित्या भारतात आणले आहेत. त्यानंतर 'टँगो' हे संत्रा वाण आणले आहे. भारतीय फलोत्पादनातील ही महत्वपूर्ण घटना असेल. भारतीय लिंबूवर्गीय फळ उत्पादकांची उत्पादकता व आर्थिक उत्पन्न यात लक्षणीय वाढ होण्यास यामुळे मदत होणार आहे. जागतिक स्तरावरील अग्रगण्य वाण टँगो हे संत्रा वाण कॅलिफोर्निया विद्यापीठाने विकसित केलेल्या जागतिक स्तरावरील अग्रगण्य संत्रा वाणांपैकी एक आहे. युरोसेमिलास या अग्रगण्य कृषी नावीन्यपूर्ण कंपनीकडे या वाणाचे जागतिक परवाना अधिकार आहेत.

**काय आहेत वाणाची वैशिष्ट्ये** - टँगो संत्रा हे मध्यम आकाराचे आणि सोलण्यास सोपे फळ आहे. त्याची अनोखी चव, संतुलित आम्ल-साखर गुणोत्तर आणि पुरेपूर रसाळपणा यात आहे. टँगो जवळजवळ बियाविरहित आहे. हेच त्याचे खास वैशिष्ट्य सांगितले जाते. याच्या प्रति २५ फळांमध्ये फक्त ०.२ बिया आहेत. जवळच्या इतर कोणत्याही वनस्पतीतील विरोधी परागीकरणाची भीती या वाणात अजिबात नाही. वैशिष्ट्यपूर्ण आकार, रंग, चव, गोडीचे प्रमाण आणि सोलण्याच्या क्षमतेसह तुलनेने सहज साध्य होणारी उत्कृष्ट गुणवत्ता हे या वाणाचे विशेष आहे. हेक्टरी ६० टन इतकी उच्च उत्पादकता असून याची ही सर्व वैशिष्ट्ये पाहता या संत्र्याला बाजारात मजबूत विक्रीक्षमता राहील यात शंकाच नाही. जगभरातील ग्राहकांकडून या वाणाला मोठी मागणी आहे.

**फायदेशीर व शाश्वत शेतीसाठी-** छोट्या व अल्पभूधारक शेतकऱ्यासाठी शेती व्यवसाय हा फायदेशीर व शाश्वत स्वरुपाचा व्हावा, ही मुख्य भूमिका 'सह्याद्री फार्म्स' या शेतकऱ्यांनी




शेतकऱ्यांसाठी चालविलेल्या शेतकऱ्यांच्या कंपनीची आहे. या कंपनीच्या पुढाकारातून जगभरातील दर्जेदार पेटंट द्राक्ष वाण आपल्या सभासद शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिले आहेत. त्यातून सामान्य शेतकऱ्यांचे अर्थकारण बदलले आहे. यातून जागतिक स्तरावर 'सह्याद्री फार्म्स'च्या शेतकऱ्यांसाची गुणवत्तेच्या द्राक्ष उत्पादनावर आधारित विशेष ओळख निर्माण झाली आहे. नव्या पेटंट द्राक्ष वाणांच्या वाढीचे व वितरणाचे अधिकारही 'सह्याद्री फार्म्स'ने प्राप्त केले आहेत. विविध वाणांच्या यशस्वी हाताळणीमुळे शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. प्लॅन्ट क्वारंटाईन प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर हे वाण सह्याद्री फार्म्स संलग्न शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत सभासद शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिले जाणार आहे.या वाण आयातीमुळे प्रीमियम फळे आणि प्रक्रिया केलेल्या लिंबूवर्गीय उत्पादनांची देशात होणारी आयात कमी होण्यास मदत होणार आहे.

राज्यात लिंबूवर्गीय फळपिकाखालील क्षेत्र सुमारे १ लाख ३५ हजारहून अधिक हेक्टर असून, सुमारे १ लाख ७० हजाराहून अधिक शेतकरी या पिकाचे उत्पादन घेत आहेत. संत्र्यांचे वार्षिक उत्पादन १८ लाख टन इतके आहे. या शेतकऱ्यांच्या हेक्टरी उत्पादकतेत आणि आर्थिक उत्पन्नात नव्या पेटंट वाणामुळे मोठा बदल होणार आहे. हा बदल या आधी द्राक्षपिकात यशस्वीरित्या घडला आहे. टँगो संत्राच्या निमित्ताने लिंबू वर्गीय फळपिकां तील मुल्यसाखळी अजून मजबूत करणे, शेतकऱ्यांमधील उच्च उत्पादन क्षमता व उच्च उत्पन्न क्षमता वाढविणे, त्यासाठी जागतिक बाजारपेठेत मजबूत स्थान निर्माण करणे, त्याचा भरीव आर्थिक लाभ शेतकऱ्यांना मिळवून देणे हे आता आमच्या समोरील प्रमुख ध्येय असल्याचे 'सह्याद्री फार्म्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे यांनी सांगितले.

**फलोत्पादनातील महत्वाचा टप्पा-** महाराष्ट्रातील फळपिकांमध्ये वाढीच्या प्रचंड क्षमता आहेत. प्रत्येक फळपिकाचा स्वतंत्र उद्योग होऊ शकतो. आपल्याकडील द्राक्षशेती हे याचे एक यशस्वी उदाहरण आहे. शेतकऱ्यांनी पुढाकार घेतला. नवे वाण शोधले. नवे तंत्रज्ञान आत्मसात केले आणि परिणामी महाराष्ट्रातील द्राक्षशेती एक उद्योग म्हणून आकारास आला. द्राक्षशेतीत आव्हाने अनंत आहेत. बऱ्याच ठिकाणी शेतकरी एकत्र येऊन त्यावर मात करताना दिसत आहे. महाराष्ट्रातील द्राक्षपिकात मागील ३ दशकांत जे सकारात्मक घडले आहे तेच आता संत्रा या राज्यातील महत्वाच्या पिकात घडण्याच्या मार्गावर आहे. शेतकऱ्यांच्या समुहशक्तीच्या जोरावर ज्या प्रमाणे जगप्रसिद्ध स्पर्धाक्षम पेटंट वाण भारतात आयात झाले आणि ते आता इथल्या मातीत स्थिरावत आहेत. तसेच शेतकऱ्यांच्या पुढाकारातून जगप्रसिध्द स्पर्धाक्षम संत्र्याचे वाणही परदेशातून भारतात दाखल झाले आहेत.

"टँगो वाणामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवर त्याचा ठळक प्रभाव पडणार आहे. लिंबूवर्गीय उत्पादनात आघाडीवर असलेले महाराष्ट्र राज्य हे याच पिकातील क्रांतीचा साक्षीदार होईल. भारतातील सध्याच्या संत्र्याच्या वाणाला जागतिक बाजारपेठेत मर्यादित वाव होता या नवीन वाणामुळे संधीची दारे खुली होतील असा विश्वास आहे."

- **विलास शिंदे,** अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सह्याद्री फार्म्स, मोहाडी, जि. नाशिक

# महसूल पंधरावडा; मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत स्वयंनोंदणी व मार्गदर्शन शिबिर



**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.३अमरावती,**यावर्षीपासून महसूल पंधरवडा दि. १ ते १५ ऑगस्टपर्यंत साजरा केला जात आहे. या कालावधीत शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपपक्रम राबवित आहे. त्याअनुषंगाने आज मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेंतर्गत स्वयंनोंदणी शिबिराचे आयोजन नियोजन भवन,जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा प्रशासनाचे वतीने करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांनी प्रशिक्षणार्थी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शासनाने घोषीत केलेल्या विविध महत्त्वाकांक्षी योजना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजना अशा विविध योजनांची माहिती व लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी



महसूल पंधरवडा कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या कार्यक्रमा अंतर्गत आज स्वयंनोंदणी शिबिराचे आयोजण करण्यात आले होते. या प्रसंगी उपस्थित होतकरु युवा प्रशिक्षणार्थी व विध्यार्थ्यांना सहाय्यक जिल्हाधिकारी अमर राऊत यांनी स्पर्धा परिक्षेबाबत मार्गदर्शन केले. तसेच कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त प्रांजल बारस्कर यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना तसेच स्वयंपोर्टल वरील नोंदणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. योजनेअंतर्गत जिल्हाधिका री कार्यालयामार्फत प्रातिनिधीक स्वरुपात ३० प्रशिक्षणार्थी यांची निवड करण्यात आली व त्यातील पाच प्रशिक्षणार्थींना रुजु आदेश प्रदान करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हानिवडणुक अधिकारी शिवाजी शिंदे, उप जिल्हाधिकारी विवेक जाधव, ज्ञानेश्वर ध्यार, हरेश सुळ, नुतन पाटील तसेच तहसिलदार निलेश खटके, प्रशांत पडघन, भाग्यश्री देशमुख आदी उपस्थित होते.

# प्रा राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे कार्यशाळा

## इलेक्ट्रिकल विभागाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित प्रा.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट बडनेरा- अमरावती, येथील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागामार्फत २२ जुलै ते २७ जुलै २०२४ या कालावधीत अभियांत्रिकी प्रकल्प हबद्वारे एम पी एस सी लॅबसाठी अर्डीनो ए टी मेगा ३२८ पी वापरून विविध मॉड्यूल विकसित करणे या विषयावर एक ड-ऑन कोर्स आयोजित केला होता. आठवडाभर चालणाऱ्या या उपक्रमादरम्यान, ६० हून अधिक विद्यार्थ्यांनी अर्डिनो बद्दल सर्वसमावेशक ज्ञान मिळवले. अर्डीनो आर एफ आय डी डोअर लॉक, अर्डीनो सह एमक्यू-१३५ स्मोक गॅस सेन्सर मॉड्युल इंटरफेसिंग, स्मार्ट ब्लाइंड स्टिक, आणि विविध सेन्सर्स इंटरफेसिंग यांसारख्या प्रकल्पांना कव्हर करून १६ वेगवेगळ्या मॉड्यूल्सवर प्रशिक्षण देण्यात आले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना भविष्यात स्वत:चे प्रकल्प विकसित करण्यास मदत करेल.इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभाग केवळ शैक्षणिक विकासावर लक्ष केंद्रित करत नाही तर आमच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घेतो. आमचे विद्यार्थी केवळ तांत्रिकदृष्ट्या उत्कृष्ट नसून सशक्त आंतरवैयक्तिक कौशल्ये विकसित करतात हे सुनिश्चित करण्याचे आमचे ध्येय आहे. चार भिंतींच्या आत नसलेली कौशल्ये आत्मसात करण्याची परवानगी मिळते.अभियांत्रिकी प्रकल्प हब हे विद्युत अभियांत्रिकी विभागाचे माजी विद्यार्थी श्री रोहित पेटले यांच्या मालकीचे आहे. या कार्यक्रमात सहमालक प्रथमेश सपाटे यांनीही सहकार्य केले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग चे तृतीय वर्षाचा विद्यार्थी श्री अथर्व हिवाळे याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभाग हा प्रो. विक्रमसिंह आर. परिहार यांच्या संकाय मार्गदर्शना खाली (इ इ एस ए) असोसिएशन च्या माध्यमातून वर्षभर अभ्यासेतर उपक्रमांचा समावेश करणारा ध्वजवाहक आहे. (इ इ एस ए) चे विद्यार्थी इलेक्ट्रिकल



इंजिनिअरिंग चे विभाग प्रमुख प्रा. अमित व्ही. मोहोड यांचे खूप आभारी आहेत की त्यांना अशा सक्रिय कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्या साठी नेहमीच प्रोत्साहन दिले जाते. या कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनाकरिता महाविद्या लयाचे प्राचार्य डॉ. डी.जी. हरकुट व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग चे विभाग प्रमुख प्रा. अमित मोहोड यांचे मार्गदर्शन आणि वेळेवर पाठपुरावा केल्याबद्दल त्यांचे विशेष आभार. तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदयजी देशमुख, कोषाध्यक्ष माननीय प्रा. डॉ. हेमंतजी देशमुख, सचिव माननीय युवराजसिंगजी चौधरी, सदस्य नितीनजी हिवसे, डॉ. सौ पूनमताई चौधरी, पंकजजी देशमुख, प्रा. विनयजी गोहाड, प्रा. गजाननजी काळे यांनी कौतुक केले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ३ ऑगस्ट २०२४ शहर/ग्रामिण


# न्यायालयीन प्रक्रिया सुरू असतांना मंडळ अधिकाऱ्यांनी केले शेतीचे फेरफार

## तहसीलदार, तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांविरोधात पोलिसांत तक्रार



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३नांदगाव पेठ–** मौजे विठ्ठलापूर येथील गट क्र.१,९व ११ या साठ एकर शेतजमिनीचा वाद दिवाणी न्यायालयात सुरू असतांना तलाठी,मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांनी संगनमताने संबंधित शेताचा फेरफार करून शासनाची व आमची फसवणूक केल्याची लेखी तक्रार कुळ कायद्यानुसार शेतीचे मालक असणारे सुनील नारायण पडोळे व रितेश मधुकर पडोळे माहुली जहागीर पोलीस स्टेशनला दिली आहे. विठ्ठलापूर येथील साठ एकर शेती ही कुळ कायद्यानुसार पडोळे कुटुंबाकडे असल्याचा दावा करण्यात आला असून ७० वर्षांपासून या शेतीची मशागत व देखभाल पडोळे कुटुंब करत असल्याने या शेतीबाबतचा दिवाणी वाद अमरावती जिल्हा न्यायालयात सुरू आहे.या प्रकरणी फेरफार करण्याची गरज नसतांना सुद्धा अर्जदारांच्या गैरहजेरीत तहसीलदार लोखंडे यांनी आदेश पारित करून तलाठी पराग पडगव्हाणकर यांनी फेरफार घेऊन मंडळ अधिकारी विजय वाघमारे यांनी मंजूर केला. याबाबत तहसीलदार लोखंडे यांनी रा.मा.क्र.एम.आर.सी ८१ विठ्ठलापूर १०१९ अन्वये ८ जुलै रोजी सूचना प्रकाशित करण्यात आली होती. याबाबत माहिती मिळाल्यानंतर अर्जदार सुनील नारायण पडोळे व रितेश मधुकर पडोळे यांनी अमरावती तहसील कार्यालय गाठून तहसीलदार यांना भेटण्याचा प्रयत्न केला मात्र तहसीलदार लोखंडे हे कार्यालयातून निघून गेल्याचा आरोप अर्जदारांनी केला आहे.दरम्यान दुसऱ्याच दिवशी फेरफार अभिलेख नायडू नामक व्यक्तीच्या नावे केल्याचा आरोप पडोळे यांनी केला आहे. संबंधीत आदेशावर अपिल करण्याचा नियमाप्रमाणे मिळणारा अवधी तसेच अर्जदारांची सुनावणीची संधी नाकारण्यात आली. सदरचा गैरव्यवहार करीत असतांना संदर्भीय न्यायालयाच्या आदेशामध्ये त्या शेत जमिनीचे भोगवटदार वर्ग–२ ला भो.वर्ग–१ करण्याचे कुठलेही प्रावधान नाही किंवा त्याबाबतचा आदेश नाही एवढेच नव्हे तर दि. २६.६.२०२४ चे अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे गैरअर्जदार यांच्याकडे एकूण क्षेत्रफळ ६० एकर इतक्या शेत जमिनीचे भोगवट वर्ग–२ चे रुपांतर भोगवटदार वर्ग–१ मध्ये करण्याची त्यांनी विनंती सुध्दा केली नाही. वरील गैरअर्जदार क्र.१ ने ती शेत जमिन भोगवगटदार वर्ग–१ मध्ये रुपांतरीत करण्याचा आदेश निर्गमित त्यामुळे शासनाची व आमची फसवणूक झाली. अधिकार नसतांना तहसीलदार यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग केला व संगणमताने शासनाचा खोटा व बनावटी अभिलेख तयार केला. संबंधीत कागदपत्राच्या पुराव्यानिशी पडोळे यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली असून दोषींवर फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.–

# केंद्राकडून हरित मिशन योजनेचा महाराष्ट्राला छदामही नाही!

## लोकसभेत प्रश्नाद्वारे लेखी उत्तरातून वास्तव उघड

### पर्यावरण, वन आणि हवामान बदल राज्यमंत्र्यांची माहिती

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३अमरावती–** केंद्र सरकारच्या हरित भारत मिशन योजनेत देशभरातील १७ राज्यांच्या समावेश करण्यात आला आहे. ही योजना सन २०१५–१६ मध्ये लागू करण्यात आली असून मात्र गत पाच वर्षात महाराष्ट्राला छदामही दिला नाही. हे वास्तव लोकसभेत प्रश्नाद्वारे लेखी उत्तरातून समोर आले आहे. त्यामुळे केंद्र सरकारची महाराष्ट्राप्रती असलेली दुटप्पी भावना स्पष्टपणे उघड होत असल्याचा आरोप अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी केला आहे.



भारत वन स्थिती अहवाल २०२१ नुसार भारतात एकूण जंगल आणि वृक्षाच्छादन क्षेत्र २२६१ चौरस किलोमीटरने वाढले. वन मंत्रालयाच्या अंतर्गत डेहराडून येथील भारतीय वन सर्वेक्षण (एफएसआय) ही संस्था १९८७ पासून देशातील वन आच्छादनाचे द्विवार्षिक मूल्यांकन करते आणि आपला निष्कर्ष भारत वन स्थिती अहवालात प्रकाशित करते, अशी माहिती पर्यावरण, वन आणि हवामान बदल राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंग यांनी लोकसभेत विचारलेल्या प्रश्नाला लेखी उत्तरात माहिती दिली आहे.

नॅशनल ग्रीन इंडिया मिशन (जीआयएम) हे हवामान बदलावरील राष्ट्रीय कृती आराखड्यांतर्गत नमूद केलेल्या आठ मोहिमांपैकी एक आहे. भारताचे वन संरक्षण, पुनर्संचयित आणि वर्धित करणे आणि निवडलेल्या भूभागांतर्गत वन आणि गैर–वने भागात वृक्षारोपण उपक्रम हाती घेऊन हवामान बदलाचा सामना करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. २०१५–१६ या आर्थिक वर्षात जीआयएम संबंधित उपक्रम सुरू करण्यात आले. मात्र वन आणि हवामान बदल मंत्रालयाने २०१९–२० या आर्थिक वर्षासाठी मंजूर वार्षिक परिचालन योजनेनुसार उपक्रम राबविण्यासाठी मागील पाच वर्षात महाराष्ट्राला छदामही दिला नाही. यावरून केंद्र सरकारचे धोरण महाराष्ट्राकरिता कशा पद्धतीचे आहे, यावरून स्पष्ट दिसून येते.

**देशाच्या वन स्थितीवर अहवाल २०२१ नुसार एक नजर....**

एकूण वनक्षेत्र ७,१३,७८९ चौरस किलोमीटर, भौगोलिक क्षेत्राच्या २१.७२ टक्के

२०१९ च्या तुलनेत एकूण वनक्षेत्रात १५४० चौरस किलोमीटरने वाढ

**वृक्षाच्छादित क्षेत्र ७२१ चौरस किलोमीटरने वाढले**

राष्ट्रीय स्तरावर एकूण वन आणि वृक्षाच्छादन क्षेत्र २२६१ चौरस किलोमीटरने वाढ केंद्र सरकारने उद्योग, रोजगार, शिक्षण अथवा सामाजिक उपक्रमांसाठी लागणाऱ्या निधीवर सातत्याने महाराष्ट्रावर अन्याय केला आहे. महाराष्ट्रातून गुजरातला उद्योग पळविण्याचे धोरण ही नित्याचीच बाब झाली आहे. आता तर हरित मिशन योजना राबविण्यासाठी गत पाच वर्षात एक रुपयाही दिला नाही, ही बाब उघडकीस आली आहे.

– बळवंत वानखडे, खासदार.

# सर्वाउत्कृष्ट कामासाठी कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करा :आ.बच्चु कडू

## महसुल पंधरवाडयांचा अचलपूर उपविभागात शुभारंभ



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३परतवाडा–** शासकीय सेवेत प्रवेश केल्यानंतर प्रत्येकच अधिकारी कर्मचारी आपले काम करीत असतात परंतु अचलपूर महसुल विभागाचे निश्चीतःच उत्कृष्ट काम आहे. तरी महसुल विभागातील अधिकारी ,कर्मचाऱ्यांनी आपल्या कामाचा दर्जा सर्वाउत्कृष्ट कसा हाईल या करिता प्रयत्न करुन सेवाव्रत जोपासावे व सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवुन दयावा. असे प्रेरणादायी प्रतिपादन दिव्यांग कल्याण मंत्रालय अध्यक्ष तथा आमदार बच्चु कडु यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय अचलपूर समोरील प्रशासकीय इमारत येथे आयोजील्या कार्यक्रमात केले. महसुल दिन व पंधरवाडा निमीत्त विविध कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी आमदार बच्चु कडु बोलत होते. यावेळी व्यासपिठावर अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, अचलपूर तहसिलदार डॉ. संजय गरकल, चांदुर बाजार तहसिलदार प्रथमेश मोहोड, ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. कार्यकारी अभियंता कोराटे, अचलपूर गटविकास अधिकारी सुधिर अरबट, चांदुर बाजार गटविकास अधिकारी नारायण आमझरे सह आदी अधिकारी व्यासपीठावर उपस्थीत होते.यावेळी, आमदार बच्चु कडु यांनी मार्मीकपणे कर्मचाऱ्यानी आपल्या कामात गोरगरीबांच्या कष्टाची जाणीव ठेवुन काम करण्याच्या सल्ला देत कामात सकारात्मकता बाळगण्याचे सांगीतले. तर उपविभागीय अधिकारी अचलपूर यांनी महसुल पंधरवाडयात विविध कार्यक्रम राबविल्या जाणार आहे. त्याचा लाभ नागरिकांनी घ्यावा. कर्मचाऱ्यांनी सुध्दा शेवटच्या घटकापर्यत पोहचुन गतीमान पध्दतीने काम करण्याचे निर्देश दिले.दरम्यान, १ ते १५ ऑगस्ट या कालावधित महसुल पंधरवाडयात विविध असे कार्यक्रम राबविल्या जाणार आहेत. त्या कार्यक्रमाची माहीती यावेळी मान्यवराकडुन देण्यात आली. तसेच ३ शेतकरी आत्महत्या ग्रस्त कुटुंबीयांना प्रत्येकी १ लक्ष रुपयाचे धनादेशाचे वितरण व सन २०२४ घर पडझडीचे झालेल्या नुकसानीचे ९ कुटुंबीयांना तर १ विज पडुन जखमी झालेल्या कुटंबीयांना आर्थीक मदतीचा धनादेश मान्यवराच्या हस्ते देण्यात आला. तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने अंतर्गत मंजुर झालेल्या लाभार्थींना प्रमाणपत्राचे वितरण केल्या गेले. प्रारंभी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमास अचलपूर, चांदुर बाजार येथील अधिकारी, कर्मचाऱ्यांरी मोठ्या संख्येने उपस्थीत होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक तहसिलदार डॉ. संजय गरकल यांनी तर नायब तहसिलदार अक्षय मंडवे यांनी संचालनासह आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता उपविभागीय अधिकारी कार्यालय अचलपूर, व तहसिल कार्यालय अचलपूर येथील कर्मचाऱ्यांनी कसोशिचे प्रयत्न केले.

# जामगाव (खडका) येथील ‘तलाठी शिक्षण मदतपेटी’ उद्या उघडणार

## गझलनवाज भीमराव पांचाळे यांची राहणार विशेष उपस्थिती

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३अमरावती –** संत गाडगेबाबा यांच्या विचारांचा आदर्श घेत वरूड तालुक्यातील जामगाव (खडका) येथील तलाठी सुनील राऊत यांच्या संकल्पनेतून शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्यांच्या सहकार्याने ’तलाठी शिक्षण मदत पेटी’ हा अभिनव उपक्रम १२ वर्षांपासून सुरू आहे.




दरवर्षी या पेटीत जमा झालेल्या रकमेतून गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मदत केली जाते.येत्या रविवारी, ४ ऑगस्ट रोजी ही पेटी उघडण्यात येणार आहे. जामगाव (खडका) तलाठीकार्यालयात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गझलनवाज भीमराव पांचाळे राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणूनशेतकरी नेते विजय विल्हेकर, ताज खान मजने खान (ताजू शेठ), जामगावच्या सरपंच लीलाताई कुमरे, उपसरपंच नीलेश ठाकरे, गीताताई पांचाळे, प्रदीप म्हैसने, माजी सरपंच मनोज पेलागडे, पळसोनाचे सरपंच सुमित गुर्जर, खडकाचे सरपंच राहुल फुले आदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी अमर मेटे, अतूल घोंगडे, अमोल बनसोड यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

# सावंगा विठोबा नगरीत अमावस्या निमित्त चंदन उटी कार्यक्रम आणि श्रावण मास मांड शुभारंभ

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३ चांदुर रेल्वे–** अमरावती जिल्हात चांदुर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे दिनांक ४/८/२०२४ रविवारला दुपारी ४.०० वाजता संस्थानच्या वतीने अमावस्या निमित्त चंदन – ऊटीचा कार्यक्रम आणि रात्री ८ ते १० वा. अवधूत नाम प्रबोधनकार भाऊदास नान्हे महाराज,वासणी(खूर्द) जि. अमरावती यांचा प्रवचन कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. चंदनउटी नंतर बाहेर गावावरून येणारे भाविकांकरिता महाप्रसाद कार्यक्रम महाप्रसाद–दाते रवी विघे,अमरावती यांचे तर्फे व संस्थानचे अन्नदान समितीच्या नियोजनात आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.५/८/२०२४ ते दि.८/९/२०२४ पर्यंत संस्थान तर्फे श्रावण मास निमित्त अखंड जागृती भजन मांडीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये गावातील आणि बाहेर गावातील अवधूत भजन मंडळांचा सहभाग राहणार असून या करिता संस्थानचे वतीने नियोजन करण्यात आले आहे.संस्थान तर्फे सहभागी अवधूत भजन मंडळाचा सन्मान करण्यात येऊन दैनंदिन चहा,नास्ता आणि भोजन इ.व्यवस्था करण्यात आली आहे.तरी सर्व भाविक– भक्तांनी तन–मन–धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम वै.नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर रा.राऊत, सचिव अशोक ह.सोनवाल सर्व विश्वस्त विनायक तु.पाटील,वामण के.रामटेके,गोविंद रा.राठोड, दिगांबर ना.राठोड, अनिल दि.बेलसरे,फुलसिंग रु.राठोड, चरणदास ना.कांडलकर,वैभव दि.मानकर, स्वप्निल ब.चौधरी विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.



# जुलै महीन्याचे धान्य १० ते १२ ऑगस्टपर्यंत मिळणार

## हजारो कार्ड धारकांना दिलासा

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.३अमरावती–** जिल्ह्यात रेशन दुकानातील पॉस मशीनच्या सर्व्हरमुळे महिन्याच्या शेवटच्या दिवसांपर्यंत हजारोंच्या संख्येने कार्डधारक रेशनपासून वंचित होते. पॉस मशीनवर थमअभावी हजारो कार्डधारक रेशननमिळाल्याची ओरड होत असताना पॉस मशीनची सर्व्हरची समस्या अखेर निपटली असुन सद्यास्थिती जिल्ह्यातील सर्वच पॉस मशीन सर्व्हरवर आल्या असल्याचा दावा पुरवठा विभागाने केला आहे. त्यामुळे मागील महीन्यात जे धान्यपासुन वंचित होते, त्यांना थमकरण्याकरीता १२ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देत मागील माहिण्याचे धान्य दिले जाणार आहे. त्यामुळे हजारो कार्डधारकांना दिलासा मिळाला आहे.जिल्ह्यात जुलै महीन्यामध्ये १५ जुलैपासुनच रेशन दुकानातील पॉस मशीनमध्ये सर्व्हरची समस्या निर्माण झाली होती. धान्याचा साठा उपलब्ध होताच सर्व्हरची समस्या सुरू झाल्याने हजारोकार्डधारकांसह रेशन दुकानदारांचीदेखील चांगलीच डोकेदुखी झाली. त्यातूनही बहुतांश रेशन दुकानदारांनी कसेबसे कार्डधारकांचे थम घेतले. त्यामुळे ६५ टक्के कार्डधारकांना



धान्य मिळाले. परंतु, त्यानंतरही ३५ टक्के कार्डधारकांचे थम अद्यापही सर्व्हरच्या समस्येमुळे झाले नाहीत. त्यामुळे त्यांना जुलै महिन्यात रेशनच मिळाले नाही. अखेर रेशनच्या प्रतीक्षेत जुलै महिनादेखील लोटलाआहे. ३१ जुलैनंतर मात्र पॉस मशीनमध्ये मागील महिन्याचे थम घेत नाही. त्यामुळे थम करण्यापासून सुटलेल्या रेशनधारकांना अखेर केव्हा राशन मिळणार, असा प्रश्न निर्माण झाला होता. दुसरीकडे जिल्हा प्रशासनाकडुन राज्यस्तरावर पॉस मशीनच्या सर्व्हरची समस्या निकाली काढण्याकरीता पाठपुरावा सुरू असतानाच गूरूवारी यातील मार्ग काढत सर्वच पॉश मशीन सर्व्हरवरआल्याचा दावा पुरवठा विभागाकडुन केल्या जात आहे. त्यामुळे मागील महीन्यांत ज्यांना धान्य मिळाले नाही त्यांना पुढील १० ते १२ दिवस पॉस मशीनवर थम करण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे मागील महीन्याचे धान्य देखील या कार्डधारकांना मिळणार आहे.

**पुढील १२ दिवस थम करण्याची सुविधा**

जिल्ह्यात पॉस मशीनवरील सर्व्हरवची समस्या आता राहली नसुन सर्वच मशील सुरळीत झाल्या आहेत. जे कार्डधारक मागील महीन्यांत धान्यापासुन वंचित राहले त्यांच्याकरीता पुढील १२ दिवस थम करण्याची सुविधा पॉस मशीनवर देण्यात आली आहे. त्यामुळे कोणीही धान्यपासुन वंचित राहणार नाही याची आम्ही दक्षता घेत आहोत.

– निनाद लांडे, जिल्हा पुरवठा अधिकारी, अमरावती,

# बडनेरा मार्गावरून जाणाऱ्या २० रेल्वे गाड्या १० ते १७ पर्यंत रद्द, ८ गाड्यांचे मार्ग बदलले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती –** दक्षिण-पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील कळमना रेल्वे स्टेशन येथे राजणांदगाव ते कळमना स्टेशनदरम्यान तिसऱ्या रेल्वे मार्गाला कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी नॉन इंटरलॉकिंग कार्य करण्यात येत आहे. त्यामुळे अमरावती व बडनेरावासीयांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विदर्भ व महाराष्ट्र एक्सप्रेस १२ ते १९ ऑगस्टपर्यंत वर्धेपर्यंत शॉर्ट टर्मिनेट करण्यात आल्या असून पुणे व मुंबईकडून बडनेरा स्थानकावरून हावडाकडे जाणाऱ्या २० गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे हावडावरून येणाऱ्या ८ गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत.

या नॉन इंटरलॉकचा हावडाकडे जाणाऱ्या अमरावती व बडनेरातील प्रवाशांना फटका बसणार आहे. त्याचवेळी हावडाकडून येणाऱ्या बहुतेक सुपरफास्ट एक्सप्रेस रद्द केल्यामुळे मुंबई, पुण्याकडे जाणारे पर्यायही मर्यादित झाले आहेत. त्याचवेळी शॉर्ट टर्मिनेटेड विदर्भ व महाराष्ट्र एक्सप्रेस ही अनुक्रमे वर्धा स्थानकावरून सीएसएमटी मुंबई व छत्रपती शाहू महाराज टर्मिनस कोल्हापूरकडे रवाना होईल व येथेच येऊन थांबणार आहे.

गाडी क्र. १२८३४ हावडा-अहमदाबाद एक्सप्रेस १० व ११ ऑगस्ट, गाडी क्र. १२८३३ अहमदाबाद -हावडा एक्सप्रेस १३ व १४ रोजी रद्द केली आहे. गाडी क्र. १२८६० हावडा -मुंबई गीतांजली एक्सप्रेस ५, ७, ११ आणि १२ ऑगस्टला तर गाडी क्र. १२८५९ मुंबई- हावडा गीतांजली एक्सप्रेस ७,९, १३ आणि १४ रोजी धावणार नाही.



गाडी क्र. १८०३० शालिमार-एलटीटी एक्सप्रेस ११ ते १७ पर्यंत रद्द, गाडी क्र. १८०२९ एलटीटी -शालिमार एक्सप्रेस १३ ते १९ ऑगस्ट पर्यंत, गाडी क्र. २२८४६ हटिया -पुणे एक्सप्रेस ५ व ९ रोजी, गाडी क्र. २२८४५ पुणे -हटिया एक्सप्रेस ७ व ११ रोजी, गाडी क्र. १२८८० भुवनेश्वर -एलटीटी एक्सप्रेस ८ व १५ रोजी, गाडी क्र. १२८७९ एलटीटी -भुवनेश्वर एक्सप्रेस १० व १७ रोजी, गाडी क्र. १२८१२ हटिया -एलटीटी एक्सप्रेस १६ ऑगस्ट रोजी रद्द करण्यात आली आहे.

गाडी क्र. १२८११ एलटीटी -हटिया एक्सप्रेस १८ रोजी, गाडी क्र. १२२२२ हावडा -पुणे दुरांतो एक्सप्रेस १५ रोजी, गाडी क्र. १२२२१ पुणे -हावडा दुरांतो एक्सप्रेस १७ रोजी, गाडी क्र. २०८५७ पुरी -साई नगर शिर्डी एक्सप्रेस ९ व १६ रोजी, गाडी क्र. २०८५८ साई नगर शिर्डी – पुरी एक्सप्रेस ११ व १८ रोजी, गाडी क्र. १२९९३ गांधीधाम -पुरी एक्सप्रेस १६ रोजी, गाडी क्र. १२९९४ पुरी -गांधीधाम एक्सप्रेस १९ रोजी, गाडी क्र. २२९३९ ओखा -बिलासपूर एक्सप्रेस १० व १७ रोजी, गाडी क्र. २२९४० बिलासपूर -ओखा एक्सप्रेस १२ व १९ रोजी, गाडी क्र. २०८२२ संतरागाच्छी - पुणे एक्सप्रेस १७ रोजी, गाडी क्र.२०८२१ पुणे -संतरागाच्छी एक्सप्रेस १९ रोजी धावणार नाहीत.

गाडी क्र. २२८९४ हावडा -साईनगर शिर्डी एक्सप्रेस ८ व १५ रोजी, गाडी क्र. २२८९३ साईनगर शिर्डी -हावडा एक्सप्रेस १० आणि १७ रोजी, गाडी क्र. २२९०५ ओखा -शालिमार एक्सप्रेस १८ रोजी, गाडी क्र. २२९०६ शालीमार -ओखा एक्सप्रेस २० रोजी, गाडी क्र. २२९७३ गांधीधाम -पुरी एक्सप्रेस १४ रोजी, गाडी क्र. २२९७४ पुरी -गांधीधाम एक्सप्रेस १७ रोजी, गाडी क्र. २२८२७ पुरी -सुरत एक्सप्रेस ११ रोजी, गाडी क्र. २२८२८ सुरत -पुरी एक्सप्रेस १३ रोजी, गाडी क्र.२०८२३ पुरी -अजमेर एक्सप्रेस ५ व ८ रोजी, गाडी क्र. २०८२४ अजमेर -पुरी एक्सप्रेस ६, ८ व १३ ऑगस्ट रोजी रद्द केली आहे.

गाडी क्र. १२१०५ मुंबई -गोंदिया विदर्भ एक्सप्रेस १३ ते १८ पर्यंत वर्धा स्टेशन येथे शॉर्ट टर्मिनेशन करण्यात येत आहे. ही गाडी वर्धा ते गोंदिया दरम्यान रद्द राहील. गाडी क्र.१२१०६ गोंदिया -मुंबई विदर्भ एक्सप्रेस १४ ते १९ पर्यंत गोंदिया ऐवजी वर्धा येथून आपल्या निर्धारित वेळेत सुटेल.

गाडी गोंदिया -वर्धा दरम्यान रद्द राहील. गाडी क्र. ११०३९ कोल्हापूर -गोंदिया महाराष्ट्र एक्सप्रेस १२ ते १७ पर्यंत वर्धा स्टेशन येथे शॉर्ट टर्मिनेशन करण्यात येत आहे. ही गाडी वर्धा ते गोंदिया दरम्यान रद्द राहील. गाडी क्र. ११०४० गोंदिया -कोल्हापूर महाराष्ट्र एक्सप्रेस १४ ते १९ ऑगस्टपर्यंत गोंदिया ऐवजी वर्धा येथून आपल्या निर्धारित वेळेत सुटेल. गाडी गोंदिया -वर्धा दरम्यान रद्द राहील.

# नागपुरी गेट पोलिसांच्या दोन धाडी

# ३१ घरगुती गॅस सिलेंडर जप्त

## मशिनच्या सहायाने गॅस काढण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती –** नागपुरी गेट पोलिसांनी ताजनगर आणि इमामनगर येथे धाड टाकून अवैधरत्यिया घरगुती सिलेंडरमधून गॅस काढण्याचा प्रयत्न हाणून पाडला. ताजनगरयेथून १६ तर इमामनगर येथून १५ सिलेंडर असे एकूण ३१ सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. मशीमनच्या सहायाने गॅस काढला जात असल्याचा प्रकार नागपुरी गेट पोलिसांच्या हद्दीत इममानगर येथे उघडकीस आला. पोलिसांनी गॅस सिलेंडरसह एकूण्या १८ हजार ९०० रुपयांचे साहित्य जप्त केले. इमामनगर येथील भोहजाद परवेज अब्दुल जहीर (३७) याच्याविरुध्द याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



गॅस सिलेंडरमधून मशीनच्या सहायाने गॅस भरण्याचा केला जात असल्याचे पोलिसांना आढळून आले. पोलिसांनी युनायटेड कंपनीची मशीन (किं ५ हजार), दोन सिलेंडर अर्धवट भरलेले (कि १४००), १५ सिलेंडर, त्यातील पाच भरलेले (किं ५०००) असा एकूण १८ हजार ९०० रुपयांचा माल जप्त केला आहे. याप्रकरणी कलम ३, ७७ जिवनावश्यक व वस्तू कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागपुरी गेट पोलिसांनी दुसऱ्या कारवाईत ताजनगर भागातून १६ सिलेंडर जप्त केले आहेत.त्यापैकी ७ भरलेले तर ९ खाली सिलेंडर आहेत. या ठिकाणी अवैधरित्या घरगुती सिलेंडरमधून मशीनच्या सहायाने गॅस काढला जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी मशीनसह, पाईप, १६ सिलेंडर असे एकूण ६५ हजार ५०० रुपयांचे साहित्य जप्त केले. आरोपी अहमदखान हमीदखान (३८)डॉ. अजय जाधव, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजेश राठोड, स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. अतिक्रमणधारकांना सूचना देण्यात आल्या. वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्यास दैनंदिन कारवाई सुरू राहणार. या कार्यवाहीत अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व बाजार परवाना विभागाचे कर्मचारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# मुलींनो निर्भया बना; पोलीस तुमच्या पाठीशी आहेतच!

## आता पोलिस काका, पोलिस दीदी पथक स्थापित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** मुलींनो , निर्भयाबना, पोलीस २४ बाय७ तुमच्यापाठीशी आहेत, अशी ग्वाही देत शहर पोलीस आयुक्तालयातील भरोसा सेलप्रमुखांनी विद्याथ्यांना 'गुड टच- बॅड टच'चे धडे दिले. तसेच सीपी नवीनचंद्र रेड्डी व पोलिस उपायुक्त (मुख्यालय) कल्पना बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस स्टेशन स्तरावर पोलिस काका, पोलिस दीदी पथक स्थापित करण्यात आले आहे. राजापेठ भागात कालपरवा एका अल्पवयीन मुलीचा गळा कापून तिचा जीव घेण्याचा प्रयत्न झाला.त्या पाश्वभूमिवर भरोसा सेलच्या प्रमुख तथा पोलीस निरिक्षक दिप्ती ब्राम्हणे यांनी शुक्रवारी शाळा, महाविद्यालय, कॉलेज यांना भेटी दिल्या. तथा विद्यार्थांना गुडटच, बॅडटच, छेडछाड, चिडिमारी तसेच एकतर्फी प्रेमातून होणारा पाठलाग, होणारी दमदाटी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.असा कुठलाही प्रकार होत असल्यास, डायल ११२ सह १०९१ व १०९८ याटोल फ्री क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आग्रही आवाहन करण्यात आले. विद्यार्थी व मुख्याधापक, शिक्षकांना त्याबाबत अवगत करुन माहिती माहिती देण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालय अमरावती शहर कार्यक्षेत्रातील महिलांना कुठल्याही प्रकारे छेडछाड, चिडिमारी, रोडरोमियो व इतर काला हा कसल्यास निर्भय होऊन पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, - उपायुक्त कल्पना बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशनस्तरावर पोलीस काका, दिदी पथक स्थापित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने शहरातील बाबा कार्नर, पंचवटी चौक, शेगांव नाका, कठोरा नाका, गद्रे चौक इत्यादी गर्दीच्या ठिकाणी पेट्रोलिग करुन महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये कार्यवाही देखील करण्यात आली.





### पालकांनो, पाल्यांना सांगा, समजून घ्या

आजकाल घडणाऱ्या वेगवेगळ्या घटनांमुळे पालकांची चिता वाढली आहे. मुलींना घराबाहेर पाठवताना किवा अनोळखी व्यक्तीसोबत पाठवताना पालक दहा वेळा विचार करतात. तुमच्या वयात येत असलेल्या मुलींना काही गोष्टी सांगणे आवश्यक आहे. कोणता माणूस कोणत्या हेतूने त्यांना स्पर्श करत आहे, हे त्यांना समजले पाहिजे. तुमच्या पाल्यासोबत मैत्रीचे नाते निर्माण करत तुम्ही त्यांना गुड टच आणि बॅड टचविषयीची माहिती सांगणे आवश्यक आहे. गुड टच आणि बॅड टच शिकवण्यासाठी जर एखाद्या व्यक्तीने केलेला स्पर्श तुम्हाला आवडला नाही तर त्याला तुम्ही काय करु शकता ते देखील पालक, शिक्षकांना सांगण्यात आले.

# सावर्डीच्या लेकीची जिद्द,पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत मिळविले यश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ नांदगाव पेठ–** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत सावर्डी येथील प्रतीक्षा रुपचंद खोब्रागडे हिने यश संपादन करत तिची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली. आहे त्या परिस्थीतीशी दोन हात करत केवळ जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर प्रतीक्षाने हे यश संपादन केले आहे.कोणत्याही प्रकारच्या शिकवणीला न जाता, वायफळ खर्च न करता, घरूनच अभ्यास करून प्रतीक्षा खोब्रागडे हिने पोलीस उपनिरीक्षकपदी मजल मारली. प्रतीक्षाचे प्राथमिक शिक्षण सावर्डी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले.त्यानंतर नांदगाव पेठ येथे पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण आणि उच्च शिक्षण अमरावती येथील विद्याभारती महाविद्यालयात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची तयारी सुरू ठेवली.कोणत्याही प्रकारची शिकवणी किंवा अभ्यासावर निरर्थक खर्च न करता मिळेल त्यांच्याकडून नोटस घेऊन व



काही पुस्तके विकत घेऊन प्रतीक्षाने घरूनच अभ्यास सुरू केला.२०२० मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पहिल्या परीक्षेत अपयश आले मात्र आपली जिद्द व चिकाटी कायम ठेवत २०२२ मध्ये प्रतीक्षाने पुन्हा परीक्षा दिली. परीक्षेनंतर ग्राउंड आणि मुलाखत मध्ये सुद्धा प्रतीक्षा यशस्वी झाली आणि १ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या निकालात २९० गुण घेऊन पोलीस उपनिरीक्षक पदासाठी पात्र ठरली. सामान्य कुटुंबातील असलेल्या प्रतीक्षाने मिळविलेले यश इतरांसाठी प्रेरणादायी आहे.सावर्डी गावातुन पोलीस उपनिरीक्षक झालेली प्रतीक्षा ही पहिली युवती असुन तिने मिळविलेल्या यशामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रतीक्षाने मिळविलेल्या या यशाबद्दल खा. बळवंत वानखडे, आ. यशोमती ठाकूर, राजकुमार मेश्राम, राहुल उके यांच्यासह अनेक मान्यवरांनी तिचे कौतुक व अभिनंदन केले.

# खासगी बसने चौघांना चिरडले

## परसापूरच्या गर्दी असलेल्या बसस्थानकावरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अंजनगाव सुर्जी–**

परतवाड्याहून अंजनगावच्या दिशेने जाणाऱ्या जय जगदंबा ट्रॅव्हलच्या बसने परसापूर बस स्थानकावर दोन बाजूने मोटरसायकलवरील चौघांना व इतर दोन मोटरसायकलींना चिरडले. ही घटना गुरूवारी (ता. एक) सायंकाळी घडली. एमएच ३० बीडी ६३५१ क्रमांकाची जय जगदंब ट्रॅव्हल्सची स्लीपर कोच बस अमरावतीहून पुणे येथे जात होती. परसापूर बसस्थानकापासून ती बस जात असताना दुसऱ्या बाजूने एक दुचाकी समोर आली. तीला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाने बस दुसऱ्या बाजूने काढली. मात्र ती बस




दुकानासमोर उभ्या असलेल्या दुचाकींना धडक देत पुढे निघाली. यातच चालकाचे बसवरील संतुलन बिघडून रस्त्यावर उभ्या असणाऱ्या चार दुचाकीला बसने चिरडले. त्यानंतर ती ट्रॅव्हल्स डाव्या बाजूला थांबली. या घटनेत चार जण जखमी झाले असून पैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती आहे. जखमींना उपजिल्हा रुग्णालय अचलपूर येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची माहिती मिळताच पथ्रोटचे ठाणेदार सचिन पुढे त्याच्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले.

कलर बॉक्सपरतवाड्याकडून अंजनगावकडे जाणाऱ्या महामार्गाला परसापूर बसस्थानकाजवळ उतार आहे. त्यामुळे परतवाडा दिशेकडून वाहने भरधाव येतात. त्या ठिकाणी वाहनांना नियंत्रित करण्यासाठी गतिरोधकाची नितांत गरज असल्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# शेती आधारितगांडूळ खताचे उत्पादन करून घ्या हमखास उत्पन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** टाकाऊ सेंद्रिय पदार्थ कुजविण्यासाठी गांडुळाचा उपयोग केला असता गांडुळे सेंद्रिय पदार्थाचे तुकडे गिळून चर्वण व पचन करून कणीदार कांतीच्या स्वरुपात शरीराबाहेर टाकतात.या खतात गांडुळाची लहान पिल्ले व अंडकोष असतात. सेंद्रिय शेतीसाठी गांडूळ खत उपयुक्त आहे, त्यामुळे मागणी अधिक आहे. गांडूळ खत निर्मितीतून उत्पन्न वाढीचा चांगला मार्ग आहे.तृणधान्य व कडधान्य पिकासाठी हेक्टरी पाच टन गांडूळ खत तशीाळलेोंीिं देण्यात येते. फळझाडांच्या वयोमानानुसार शेणखताच्या मात्रेच्या निम्मी मात्रा गांडूळ खताची द्यावी. गांडूळ खतामुळे जमिनीचा पोत सुधारतो. जलधारणा शक्ती वाढते. जमिनीची धूप कमी होते.

### कसे कराल गांडूळ खत

गांडुळांची मोठ्या प्रमाणावर पैदास करण्यासाठी एक मीटर लांब, एक मीटर रुंद, व ३० सेंटीमीटर उंचीची लाकडी खोकी अथवा सिमेंटच्या टाक्या अथवा प्लास्टिकच्या टबचा वापर करावा.

- खोक्याच्या तळाशी तीन सेंटीमीटर जाडीचा सावकाश कुजणाऱ्या सेंद्रिय पदार्थाचा (लाकडी भुसा, तूस, काथ्या अथवा पाचट) थर रचावा.

- त्यावर तीन सेंटीमीटर जाडीचा कुजलेल्या शेणखताचा अथवा शेणखत तसेच मातीचा थर द्यावा.

- प्रत्येक थरावर पाणी




शिंपडून भिजवून घ्यावे.

- या थरावर १,००० पूर्ण वाढ झालेली गांडुळे सोडावीत.

- त्यावर गांडुळाच्या खाद्याचा १५ सेंटीमीटर जाडीचा थर पसरावा.

- या खाद्यामध्ये १० भाग कुजलेले शेण, एक भाग भात किंवा गव्हाचा कोंडा, एक भाग हरभऱ्याच्या सालीचा कोंडा आणि १ भाग भाजीपाल्यांचे अवशेष अथवा कुजलेला पालापाचोळा यांचे मिश्रण असावे. या थरावर पाणी शिंपडून ओले बारदाना अंथरावे.सूर्यप्रकाश आणि पावसापासून संरक्षण करण्यासाठी खोकी सावलीत ठेवावीत.उंदीर, घूस, मुंग्या, बेडकांपासून गांडुळाचे संरक्षण करावे.

- आठ ते दहा दिवसांनंतर खाद्याच्या पृष्ठभागावर लहान ढिगाच्या स्वरूपात गांडुळाची कणीदार कात दिसून येईल.ही कात वेगळी करून खत म्हणून वापर करावा.

खाद्य जसजसे कमी होत जाईल, तसतसे वरच्या थरावर खाद्य घालत रहावे.

- साधारणतः आयसेनिया फेटिडा आणि युड्रीलस युजिनी या जातीच्या एका जोडीपासून तीन महिन्यानंतर ६० गांडुळांची निर्मिती होते.

### गांडूळपाणी (वर्मीवॉश)

गांडुळाचे शरीर लांब व दंडगोलाकृती असून आतील बराचसा भाग पोकळ असतो. या पोकळ भागात आतड्यांचा भाग असून त्याच्या सभोवती पेशींचा थर असतो. हा पोकळ जाड द्रव्याने भरलेला असतो. गांडुळांच्या शरीरातून पाणी जाऊ दिले तर हा द्रव गोळा करता येतो. यालाच 'वर्मी वॉश गांडूळपाणी' म्हणतात. गांडूळपाण्यात पिकांच्या वाढीस उत्तेजक पदार्थांचा समावेश आहे. हे पिकांच्या पानावर फवारतात.

# संततधार पावसातही सुरळीत सेवा देण्यासाठी महावितरण सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

मागील पंधरा दिवसांपासून परिमंडळात सुरू असलेल्या संततधार पावसात आलेले अनेक तांत्रिक दोष दुर करत या काळात सुरळीत वीज पुरवठा करून सामान्यांचे जीवन सुकर करण्याचे काम महावितरणकडून करण्यात आले आहे.वीज ही अत्यावश्यक सेवा आहे.शिवाय विजेवर पाणी,चक्की,तसेच दळण-वळणाच्या अनेक बाबी अवलंबून असल्याने या काळात वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या निर्देशानुसार अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यात वीज यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.



वारा,मुसळधार पावसाचा परिणाम होतो.महापूरात वीज वाहिनी तसेच वीज खांबही वाहून जाते,वीज वाहिन्या तुटने,पोल पडणे असे अनेक प्रकार घडतात.त्यामुळे अनेक गावे अंधारात जाण्याची शक्यता निर्माण होते. अश्यावेळी महावितरणकडून पर्यायी वीज वाहिन्यांचा वापर करून वीज पुरवठा करण्यात येतो आणि नादुरूस्त वाहिन्यांची त्वरीत देखभाल दुरूस्ती करून त्या कार्यान्वित करण्यात येतात .

**तुटलेल्या वाहिनीला/खांबाला हात लावू नये:-** कोणत्याही कारणामुळे एखाद्या ठिकाणी महावितरणचे वीज खांब,वीज वाहिनी तुटून पडली असेल, तर त्याला कोणीही हात लावू नये.कारण त्यात वीज प्रवाह असण्याची आणि त्यामुळे प्राणांतिक अपघात होण्याची शक्यता असते.अश्यावेळी महावितरणच्या नजिकच्या कार्यालयात किंवा अमरावती जिल्ह्यासाठी असलेल्या दैनंदिन सनियंत्रण कक्षाच्या ७८७५७६३८७३ या नंबरवर आणि यवतमाळ जिल्ह्याकरीता ७८७५७६३०९९ या मोबाईल नंबरवर संपर्क करून माहिती देण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

**महावितरण यंत्रणा सज्ज :-**वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी सज्ज आहेत.परंतू पाऊस आणि विजेच्या असलेल्या विरोधाभासी संबंधामुळे अनेकदा तांत्रिक दोष निर्माण होऊन वीज पुरवठा खंडित होतो. दोष शोधण्यासाठी बरेचदा संपूर्ण वीज वाहिन्यांचे पेट्रोलिंग करावे लागते. त्यानंतर दोष निवारण्यासाठी थोडा कालावधी लागत असल्याने वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर काही काळ वीज ग्राहकांनी संयम बाळगावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

# उपायुक्त माधुरी मडावी यांनी केली यास्मिननगर परिसराची पाहणी

## नालीवरचे अतिक्रमण ही हटविले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

महानगरपालिका उपायुक्त माधुरी मडावी यांनी यास्मिन नगर परिसराची पाहणी केली. या पाहणी दरम्यान नालीवर अतिक्रमण आढळून आल्याने ते त्वरीत काढण्याचे निर्देश देत ते जेसीबीच्या सहायाने काढण्यात आले.



अतिक्रमण काढल्याने या रस्त्यांनी आता मात्र मोकळा श्वास घेतला आहे. यात व्यवसायीक यांनी स्वताची दुकान प्रतिष्ठाने नालीवर अतिक्रमण करून मार्ग अडविला होता. त्यासह अनेक इमारतीचे अतिक्रमण काढण्यात आले.शहरातील मुख्य रस्त्यावरील दुतर्फा नालीवरील अतिक्रमणे हटविण्याची व नाली सफाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे नागरिकांनी केली होती. त्याचबरोबर दुकानदारांनी रस्त्यावर दुकानांचा विस्तार केला होता. त्यामुळे नागरिकांना जाण्या- येण्यास त्रास होत होता. नागरिकांच्या वारंवार तक्रारी येत असल्याने अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात आली.

शहरातील विविध परिसरातील मुख्य रस्त्यावरील संपूर्ण अतिक्रमणे हटविण्यात येत आहेत. अमरावती महानगरपालिकेने व्यावसायिकांना जागा भाड्याने दिली.

असून, रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुकानांसमोर अनेक दुकानदारांनी नाल्यावर ढापे टाकूनसमोर अतिक्रमण केले होते. यामुळे नाली सफाई केली जात नव्हती. सर्व गटारी तुंबल्या होत्या. त्यामुळे महानगरपालिकेने ही कारवाई केली.

यावेळी सहाय्यक आयुक्त विवेक देशमुख, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजेश राठोड, स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# बिहाली उपकेंद्रात मानव विकास आरोग्य शिबिर गर्भवती मातांची तपासणी ; कुपोषित बालकांवर उपचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३ मेळघाट**

सलोना प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत येत असलेल्या बिहाली उपकेंद्रात रविवार ता २८ रोजी मानव विकास आरोग्य शिबीर आयोजित केले होते या मानव विकास आरोग्य शिबिरात बालरोग तज्ञ म्हणून डॉ पवार तर स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून डॉ सेन्द्रे यांनी तपासणी केली या मानव




विकास आरोग्य शिबिरात ३३ गरोदर माता, स्तनदा माता १५,कुपोषित बालके १३ तर इतर ४२ रुग्णांची तपासणी करण्यात आली ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांचीही तपासणी करण्यात आली त्याशिवाय मध्यम व तीव्र कुपोषित बालकांवर औषधोपचार करण्यात आले या आरोग्य शिबिरासाठी बिहाली उपकेंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ गजानन खरपास,आरोग्य सेवक अनिल सुरत्ने, आरोग्य सेविका भालाधरे, आशा सेविका प्रेमीला उके,वासती बेलसरे,रुपाली भुसुम,रुखमी अथोटेयांनी सहकार्य केले.

# पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचा पुणे येथे भव्य माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

## महाविद्यालयाच्या जुन्या आठवणीत रमले माजी विद्यार्थी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती च्या माजी विद्यार्थी मेळावा पुणे येथे नुकताच आयोजित करण्यात आला होता, पी. आर.पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे हजारो विद्यार्थी पुणे येथे विविध सॉफ्टवेअर व कोअर कंपनी मध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत, पुणे येथे कंपनी मध्ये कामानिमित्त असलेल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांकरिता त्यांच्या वर्गमीत्रांशी पुन्हा मनोमिलन होण्यासाठी आणि त्यांचे व्यावसायिक देवाणघेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ महाविद्यालयाच्या वतीने या मेळाव्याच्या निमित्ताने उपलब्ध करण्यात आले. या पुनर्मिलनामध्ये महाविद्यालयाच्या स्थापने पासून तर आज पर्यंतच्या पदवीधरांचा समावेश होता, ज्यामुळे त्यांना सर्व उपस्थितांसाठी एक संस्मरणीय



अनुभव सुनिश्चित करून हा कार्यक्रम पुणे येथील हॉटेल बर्ड व्हॅली येथे आयोजित करण्यात आला होता. जवळपास पुण्यात विविध कंपनीमध्ये उच्च पदावर असणारे कामपणीचे सीईओ,संचालक, आयटी मॅनेजर, नेटवर्क ॲडमिनिस्ट्रेटर, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, सिस्टीम ॲनालिस्ट, डेव्हलपर , प्रोडक्ट मॅनेजर, सिस्टम आर्किटेक्ट, सर्व्हिस इंजिनिअर अश्या ४९३ विद्यार्थ्यांनी या माजी विद्यार्थी मेळाव्याला उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील आणि उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील यांच्या हस्ते तसेच प्रा. मोनिका जैन हेड कॉर्पोरेट रिलेशन , प्राचार्य , उपप्राचार्य, विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पारंपारिक दीप प्रज्वलनाने झाली. त्या नंतर कार्यक्रमची रूपरेषा आणि माहिती इलेकट्रीकल विभाग प्रमुख डॉ. दीपक शाहाकार यांनी दिली. सोबतच संस्थेचे अध्यक्ष श्री प्रवीण पोटे पाटील यांनी या प्रसंगी येणाऱ्या काळातील रोजगार आणि त्याकरिता लागणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी आज नामांकित कंपनीमध्ये उच्च पदावर लाखोंच्या पॅकेजमध्ये कार्यरत आहेत याचा अभिमान पी. आर. पोटे पाटील ग्रुप ला असल्याचा यावेळी आपल्या शब्दातून व्यक्त केला.

सर्व माजी विद्यार्थी एकत्र आल्यावर सर्वांनी आपला परिचय दिल्यावर त्यावेळेच्या काही गमतीदार आणि काही चांगल्या आठवणींना उजाळा दिला यात एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली तसेच माजी विद्यार्थ्यांनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करत महाविद्यालयाप्रती आपले प्रेम व्यक्त केले.

प्रा. मोनिका जैन हेड कॉर्पोरेट रिलेशन यांनी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागचे वतीने घेण्यात येणाऱ्या ॲक्टिव्हिटी , प्लेसमेंट करिता महाविद्यालयात येणाऱ्या राष्ट्रीय तसेच बहुराष्ट्रीय कंपन्या याबद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

या मेळाव्यासाठी संयोजक समिती, प्राध्यापक सदस्य आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांचा समावेश असून, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी अथक परिश्रम घेतले. यासाठी विविध माध्यमांचा वापर करून सर्व माजी विद्यार्थ्यांना आमंत्रणे पाठवली गेली. माजी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद कौतुकास्पद होता, ४९३ माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या उपस्थिती दर्शवली.

या मेळाव्याला महाविद्यालयाचे प्राचार्य, विभाग प्रमुख अल्युमिना कोऑर्डिनेटर व प्राध्यापक उपस्थित होते. आर्टिफिशिअल अँड डेटा सायन्स चे विभाग प्रमुख डॉ. अजय गडीचा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर भार प्रदर्शन डॉ. ए. के. चिटकेश्वर महाविद्यालयाचे अल्युमिना कोऑर्डिनेटर यांनी केले.

# विद्यार्थ्यांना स्वत:ला सदैव तयार ठेवा, यश निश्चित-जिल्हाधिकारी

## विद्यापीठात रोजगार मेळाव्याचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

विद्यार्थ्यांनी मनात कसलीही भीती न ठेवता, परीक्षा असो, मुलाखत असो वा त्यासाठी स्वत:ला सदैव तयार ठेवावे, यश निश्चितच मिळेल, असा मौलिक सल्ला अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी विद्यार्थ्यांना दिला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील ए.व्ही.थिएटर (दृकश्राव्य सभागृह) येथे शनिवारी ३ ऑगस्ट रोजी आयोजित रोजगार मेळाव्याचे उद्घाटन केल्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, अधिसभा सदस्य डॉ. आशीष सावजी, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल असोसिएशन, अमरावतीचे अध्यक्ष किरण पातुरकर, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हसेसचे एच.आर. विशाल रामपल्ले, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयाचे उपायुक्त द.लं. ठाकरे, सहायक आयुक्त सौ. प्रांजली बारस्कर, विद्यापीठ विद्यार्थी विकास संचालक डॉ.राजीव बोरकर उपस्थित होते.



जिल्हाधिकारी पुढे म्हणाले, कंपन्यांना नेहमीच मनुष्यबळाची आवश्यकता असते आणि कौशल्ययुक्त मनुष्यबळाला त्यांची पसंती असते. कंपन्यांना हवे असलेले कौशल्य विद्यार्थ्यांनी आपल्यात तयार करावे. त्यामुळे आपल्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असतील. विद्यार्थ्यांनी आपल्यातील कौशल्य आणखी विकसित करावे. आज अनेक कोर्सेस ऑनलाईन उपलब्ध आहेत, त्याचा लाभ घेऊन आत्मविश्वासाने पुढे जावे, असे मोलाचे मार्गदर्शन जिल्हाधिकारी यांनी विद्यार्थ्यांना केले.

**विद्यार्थ्यांना आपल्यातील कौशल्य आणखी विकसित करावं-कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते**

विद्यार्थ्यांना आपल्यातील कौशल्य आणखी वाढवावे. निवड झाली नाही म्हणून आपण कुठे कमी पडलो, याचे चिंतन करावे, जेणेकरुन ते भरुन काढता येईल व पुढे आपल्याला यश मिळेल, असे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणातून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. ते म्हणाले, बजाज फायनान्स कंपनीकडून विविध क्षेत्राची निकड लक्षात घेता, त्यांनी तीन-तीन महिन्यांचे रोजगाराभिमुख असे अभ्यासक्रम सुरू केलेले आहेत व सदर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावरच रोजगार मिळेल. विद्यापीठासह महाविद्यालयांनी सुध्दा अशा प्रकारचे अभ्यासक्रम राबविल्यास विद्यार्थ्यांना अन्य शहरांमध्ये न जाता स्थानिक स्तरावरच रोजगार उपलब्ध होईल. रोजगार मेळाव्यात आपली निवड झाली नाही, म्हणून कोणीही निराश होऊ नये. आपण कुठे कमी पडलो, याचे चिंतन करावे. इंग्रजी भाषा बोलायला शिका.आपसात ग्रुप तयार करा आणि एकमेकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करा, त्यात निश्चितच यश मिळेल. विद्यापीठाकडून अशाप्रकारचे उपक्रम पुढेही राबविण्यात येईरल, असा विश्वासही कुलगुरूंनी याप्रसंगी व्यक्त केला.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकातून विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी रोजगार मेळाव्याचे महत्व सांगितले. सूत्रसंचालन श्री अमोल मोहोड यांनी, तर आभार कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयाच्या सहायक आयुक्त सौ. प्रांजली बारस्कर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक तसेच कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयातील कर्मचारी याशिवाय रोजगार मेळाव्याकरीता आलेले विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साधू संत येती घरा गजानन महाराजांची पालखी आज विदर्भात; पहिला मुक्काम जिजाऊंच्या माहेरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३ बुलढाणा**

साधू संत येती घरा तोची दिवाळी दसरा. राजमाता जिजाऊंच्या पावन वास्तव्याने पुनीत ऐतिहासिक सिंदखेडराजा सह पंचक्रोशीतील हजारो भाविकांची आज अशीच भावावस्था आहे. आज त्यांची मने अधीर आहेत, त्यांचे डोळे 'त्या' दिशेला आणि वाटेकडे लागले आहेत. त्यांच्यासाठी दसरा आणि दिवाळी आजच आहे

याचे कारण शेगाविचा राणा



संत गजानन महाराज यांची पालखी आज शनिवारी ,३ ऑगस्टला संध्याकाळी विदर्भात डेरेदाखल होणार आहे. मराठवाडा मधून थाटात येणारी शेकडो वारकऱ्यांची ही पालखी मातृतीर्थ सिंदखेडराजा मध्ये दाखल होत

**११ ऑगस्टला पोहचणार शेगावात**

आहे.पालखीचा पहिला मुक्काम सिंदखेडराजा मधील जिजामाता विद्यालयात राहणार आहे. यामुळे आज शनिवारी सकाळ पासूनच जिजाऊंच्या माहेरात पालखीसह येणाऱ्या वारकरी आणि चोहोबाजूनी येणाऱ्या हजारो आबालवृद्ध भाविक भक्ताच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात येत आहे. पालखीच्या रात्रीच्या मुक्कामाची, महाप्रसाद वितरण ची तयारी करणाऱ्या यजमान आयोजकांची लगबग, धावपळ दिसून येत आहे.

सिंदखेड राजावरून उध्या ४ ऑगस्ट रोजी सकाळी पालखी बुलढाणा जिल्ह्यातील पुढील प्रवासाला रवाना होणार आहे. सिंदखेडराजा येथून निघालेली पालखी लोणार, मेहकर, खामगाव तालुक्यातील गावातून शेगावी दाखल होणार आहे. शेगाव येथे ११ ऑगस्ट रोजी पालखी पोहोचणार आहे.

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ३१३ प्रकरणे निकाली; ८५६१९९५ रुपये रक्कम वसूल

## जिल्हा न्यायालय, विधी सेवा समिती: तडजोडीतून प्रकारणे निकाली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३वरूड**

स्थानिक जिल्हा न्यायालय-१ व अतिरिक्त सत्र न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे जिल्हा न्यायालय-१ व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि तालुका विधी समितीच्यावतीने शनिवारी आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तडजोडीने ३१३ प्रकारणे निकाली काढण्यात येऊन ८५ लाख ६१ हजार ९९५ रुपये रक्कम वसूल करण्यात आले.

राष्ट्रीय लोकअदालतीच्या पॅनल क्र. १ चे प्रमुख न्यायाधीश असलेले जिल्हा न्यायाधीश ए. सी. आवटे, पॅनल वकील अधिवक्ता व्ही. जी. बघेले, कर्मचारी एस. एस. साहू, एस. आर. वाट, आर. आर. राऊत, एम. बी. वाघमारे यांनी काम पाहिले, तर पॅनल क्र. २ वर पॅनलप्रमुख



दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर एस. पी. लंकेश्वर, पॅनल वकील पी. बी. कोल्हारे, कर्मचारी एस. आर. मुकवाने, एन. एम. झंगळे, एन. डब्ल्यू. धुळे, डी. एम. रोहिले, आर. बी. शियाले, आर. बी. घडेकर, आर. जी. मलवार, ए. पी. मोहोड, ए. एन. झंगळे, एच. एस. गजभिये यांनी काम पाहिले. लोकअदालतीमध्ये पॅनल क्र.१ मध्ये न्यायालयीन तडजोड पात्र ४६६ खटले ठेवण्यात येऊन १०५ खटले निकाली निघाले. यामध्ये तडजोड रक्कम ५४ लाख १४ हजार ७६२ रुपये रक्कम वसूल झाली. पॅनल क्र.२ मध्ये पूर्व तडजोडपात्र खटले एकूण ४२९२ ठेवण्यात आले होते. त्यापैकी एकूण २११ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामध्ये तडजोड रक्कम ३१ लाख ४७ हजार २३३ रुपये वसूल झाली.

एकूण ३१३ तडजोड खटले निकाली निघाले. यामध्ये तडजोड रक्कम ८५ लाख ६१ हजार ९९५ रुपये रक्कम वसूल करण्यात आली. राष्ट्रीय लोकअदालतीचे कामकाज अधीक्षक आर. बी. वानखडे, सहायक अधीक्षक एस. के. अंबलकार, आर. व्ही. पाटील, आर. डी. पानडे, सी. व्ही. पाठकसह न्यायालयीन कर्मचारी तसेच तालुका विधी समितीच्या सदस्यांनी पार पाडले.

# भाजपचे वरुडात महाअधिवेशन.....









लोकसभा निवडणुकीनंतर भाजपने विधानसभा निवडणुकीची मोर्चे बांधणी सुरू केली आहे. त्या अनुषंगाने वरुडात आज (ता.२) पांढुर्णा रोड येथील रामदेव बाबा मंगलम येथे भारतीय जनता पार्टीचे महा अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री यांची प्रमुख उपस्थिती होती तर या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमरावती जिल्ह्यातल्या १४ ही तालुक्यातून पदाधिकारी व कार्यकर्ते या अधिवेशनासाठी वरूडात दाखल झाले होते.

## रुग्णालये फुल्ल : जलजन्यसह कीटकजन्य आजारांचीही साथ बिलाविना औषधांची विक्री; आता एफडीएच्या रडारवर

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

पावसाळ्यात जलजन्य व तत्सम आजारांमुळे अमरावती शहरासह जिल्हाभरात शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये गर्दी वाढत आहे. अशा स्थितीत काही औषध विक्रेते बिलाविना औषध विक्री करू शकतात. तसेच स्थानिक जनरल फिजिशियनकडूनही

फार्मासिस्टप्रमाणे औषधी देण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या घटनांना आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभाग तपासणीसाठी अलर्ट झाला आहे.

राज्यातील शेड्युल 'के' अंतर्गत येणारी अनेक औषधे काही स्थानिक डॉक्टरांकडून त्यांच्याकडे येणाऱ्या रुग्णांना तसेच बाहेरून येणाऱ्या रुग्णांना विकली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही डॉक्टरही मेडिकल दुकानदारांप्रमाणेच मोठ्या प्रमाणात औषधांचा साठा करून नियमांचे उल्लंघन करू शकतात. औषध खरेदीच्या नोंदी ठेवणे बंधनकारक आहे.पावसाळ्यात रुग्ण संख्या वाढल्याने बिलाविना औषधांची विक्री होण्याचा धोका आहे.काही डॉक्टर मोफत मिळणाऱ्या औषधांच्या नमुन्यांची विक्री करू शकतात. या पार्श्वभूमीवर एफडीए आयुक्त (औषध) यांनी राज्यातील सर्व औषध निरीक्षकांना सहभागी असलेल्या डॉक्टरांच्या दवाखान्यात अचानक तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुंबई व काही जिल्ह्यांत १ ते १४ ऑगस्ट या कालावधीत तपासणी करण्याच्या सूचना एफडीए प्रशासनाकडून निरीक्षकांना दिल्या. अमरावती जिल्ह्यात नियमांचे कठोर पालन व्हावे यासाठी तपासणी मोहिम लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती आहे.



### काय आहे नियम

औषध व सौंदर्यप्रसाधने कायदा १९४५ अन्वये परवान्याशिवाय औषधसाठा करता येत नाही किंवा विकता येत नाही. त्यासाठी कडक नियम आहेत. मात्र, काही डॉक्टर औषधांचा साठा मोठ्या प्रमाणात ठेवतात. दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांव्य- तिरिक्त बाहेरून येणाऱ्या रुग्णांनाही औषधांची विक्री केली जाते. ते पूर्णतः बेकायदेशीर आहे.

## ज्वारी उत्पादक शेतकरी संकटात : राज्य शासनाकडे १७ कोटी ७१ लाख रु थकीत

### जिल्ह्यातील ९ तालुक्यात खरेदी केंद्रे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

शासनाला शेतकऱ्यांनी हमी भावावर विकलेल्या ज्वारीची १७ कोटी ७१ लाख रुपये अद्यापही अप्राप्त आहे. सदर रक्कम लवकरात लवकर द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

शासकीय हमीभाव ३ हजार १८० रुपये प्रती क्विंटल असा असून सदर खरेदीकरिता शासनाचे जिल्ह्यात ९ ठिकाणी तालुकास्तरावर मागणीनुसार केंद्र उघडण्यात आले आहे. त्यामध्ये अमरावती, अचलपूर, दर्यापूर, नांदगाव खंडेश्वर, मोर्शी, अंजनगाव सुर्जी, चांदूर रेल्वे, चांदूरबाजार, तिवसा खरेदी-विक्री संस्थेमार्फत शासकीय हमीभावावर ज्वारीची खरेदी केली गेली आहे. ९ तालुक्यांत १ ऑगस्ट २०२४ पर्यंत एकूण ६४ हजार ३६७ क्विंटल ज्वारी खरेदी करण्यात आली. त्यापैकी शासनाने शेतकऱ्यांसाठी ३ कोटी ४६ लाख रुपयांचा पहिला टप्पा पाठविला असून सदर रक्कम जिल्हा - मार्केटिंग अधिकारी कार्यालयाने संबंधित - शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली आहे. मात्र, दुसऱ्या टप्याची रक्कम मोठी असून शेतकऱ्यांची संख्यासुद्धा जास्त आहे.



सदर शेतकऱ्यांची उर्वरित १७ कोटी ७१ लाख एवढी रक्कम अद्यापही शासनाकडे शिल्लक आहे. सदर रक्कम लवकरात लवकर मिळावी, अशी मागणी ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

**५० हजार क्विंटल ज्वारी मोजणीच्या प्रतीक्षेत**

पोर्टल बंद झाल्याने आता नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांची ज्वारी मोजण्याची प्रक्रिया ठप्प पडली आहे. ज्वारी खरेदीची मुदत ३१ जुलै रोजी संपली आहे. अद्याप शासनाने मुदतवाढ दिली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीची भावना आहे.

**हमाल, मापारी बेरोजगार**

ज्वारी मोजणी, पोते भराई, शिलाई, चाळणी ट्रकमध्ये पोते भरणे, काढणे यासाठी मापारी आणि हमालांच्या हाताला काम मिळते. अनेक हमालांना रोजगार मिळतो. सध्या खरेदी बंद असल्याने त्यांची चुल कशी पेटेल, असा प्रश्न बाजार समिती संचालक पोपट घोडेराव यांनी उपस्थित केला आहे.

## हत्तीने दगा दिला, बेडकाने केले जलमय, आता गाढवाकडे लक्ष ! पावसाचे नक्षत्र : वाहनांकडून समाधानकारक पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती**

यंदा मृग नक्षत्रात पावसाचे वाहन कोल्हा असताना ७ जूनला पावसाचे वाहन कोल्हा होते. मृगनक्षत्रातील पहिले दोन दिवस पावसाने जोरदार हजेरी लावली होती. त्यामुळे शेतीच्या कामात मदत मिळाली होती. त्यानंतर पावसाने दडी मारल्यामुळे शेतीच्या कामात अडथळा आला. ५ जुलैपासून पावसाने हत्तीला वाहन बनविले पण सरासरी पाऊस घेऊन येणाऱ्या हत्तीने हुलकावणी दिली. १९ जुलैला पाऊस बेडकावर स्वार होऊन आला आणि दमदार हजेरी लावली. अनेक ठिकाणी अतिवृष्टीसुद्धा फटका बसला. आता २ ऑगस्टपासून पाऊस गाढवावर स्वार होत असून दमदार पाऊस बरसणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

यंदा समाधानकारक पाऊस पडणार असा अंदाज हवामान खात्यानेहवामान खात्याने व्यक्त केला होता. त्यानुसार आतापर्यंत हवामान खात्याचा अंदाज बऱ्यापैकी खरा ठरत



असला तरी निम्मा पावसाळा बाकी असून पुढे पाऊस कसा राहील हे नेमके सांगता येणार नाही. अनेकवेळा हवामान खात्याच्या अंदाजसुद्धा चुकीचा ठरतो. पावसाळ्यातील ९ नक्षत्रांमध्ये पावसाचे वाहन ठरवितात. त्यानुसार पावसाचा अंदाज ठरविला जातो.

| दिनांक | नक्षत्र | वाहन |
|---|---|---|
| २ ऑगस्ट. | आश्लेषा. | गाढव. |
| १६ ऑगस्ट. | मघा. | कोल्हा. |
| ३० ऑगस्ट, | पूर्वा. | उंदीर. |
| १३ सप्टेंबर. | उत्तरा | हत्ती. |
| ३० सप्टेंबर. | हस्त. | मोर. |
| १० ऑक्टोबर. | चित्रा. | म्हैस. |

पावसाच्या वाहनांमध्ये हत्ती, बेडूक, म्हैस असेल तर भरपूर प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता असते. उंदीर, गाढव, मेंढाअसेल तर कमी पाऊस पडतो. जर कोल्हा, घोडा व मोर असेल तर मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असते. यंदा बेडकाने भरपूर प्रमाणात पाऊस पाडला. आता पुढे गाढव काय करणार याकडे शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

## आमदार रवी राणा यांचा मनपा आयुक्त सचिन कलंत्री यांचा बडनेरा मध्ये पाहणी दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ बडनेरा**

सध्या मागील दहा ते पंधरा दिवसापासून पाण्याने अतिसार केल्यामुळे अनेक रोगराई पाण्यामार्फत मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव पसरवीत आहे त्यामध्ये महत्त्वाचे म्हणजे डेंगू चे रुग्ण सोबत स्वाईन फ्लू आणि काही कोरोना चा प्रादुर्भाव असलेले रुग्ण यांच्यात वाढ होत असल्यामुळे आमदार राणा यांनी क्शन मोडवर येत मनपा प्रशासनाला धारेवर धरत आज बड्नेरा नवी वस्ती भागामध्ये पाच तासाचा दौरा करीत परिसरातील नागरिकांशी चर्चा करून त्यांच्या तक्रारी स्वीकारून त्या तक्रारीचे निराकरण जनतेसमोरच करत प्रशासनास खडक निर्देश दिले

दौऱ्या दरम्यान परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून त्यांच्याशी चर्चा करून त्यांच्या समस्याचा निराकरण करून साफसफाई बाबत ठेकेदारांना तसेच प्रशासनांना चांगलेच खडसावले नवी वस्ती भागामध्ये झालेल्या या दौऱ्यामध्ये हा दौरा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक पासून सुरू होऊन आठवडी बाजार लक्कडगंज इंदिरानगर आदिवासी नगर पंचशील नगर शिंदी कॅम्प जंजाळपुरा शिक्षक कॉलनी सद्गुरु नगर शिवाजीनगर रजा नगर मिलचाळ अशोक नगर हरिदास पेठ तसेच जुनी वस्ती येथे समाप्त करण्यात आला आमदार रवी राणा यांच्या या दौऱ्या अंतर्गत येणाऱ्या जुनी वस्ती येथे सुरू असलेले सावता मैदान स्थित सांस्कृतिक भवनाच्या कामाला वेग देण्याकरिता सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले कामामध्ये दिरंगाई न करता सदर काम वेगाने करण्यात यावे



आणि या कामात आणखीन जर खर्च लागत असेल तोही आपण करण्यास तयार असल्याचा आमदार राणा यांनी प्रशासनाला सांगितले एकूण वीस कोटीच्या जवळपास या वास्तूची निर्मिती केली जात आहे त्यामुळे बडनेरा वासियांसाठी अत्यंत महत्त्वाची ही वास्तू असून प्रत्येकाच्याच उपयोगी पडणारी असल्याची माहिती सुद्धा आमदार य़ानी दौऱ्या दरम्यान दिली आमदार राणा यांच्या पाच तासाच्या दौऱ्यामध्ये अमरावती मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्यासोबत मनपा मधील प्रशासकीय अधिकारी खान साहेब, बांधकाम विभागाचे तायडे साहेब अभियंता तांबेकर अतिक्रमण विभागाचे श्याम चौरे बडनेरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण मनपा कर्मचारी एम एस सी बी चे कर्मचारी संख्येने या दौऱ्यात सहभागी होते परिसरातील नागरिकांमधूनअजय जयस्वाल लाइक अहमद पटेल मनोज गजभिये सिद्धार्थ बनसोड सतीश भालेराव सुरेश इंगळे किशोरी इंगोले प्रमोद गवई पप्पू भालेराव रोशन चव्हाण रणजीत जाधव तोफिक कुरेशी मजीद बापू कुरेशी प्राध्यापक अमोल मिलखे गजानन सावंत मुस्ताक शेख सुधीर लवणकर संजय मुंडले मंगेश चव्हाण सोनू रंगटा चंदू मल बिल्दाणी शेख नूर शहजाद अहमद राऊत पटेल कमरुद्दीन अजमत पटेल विजय मेघवानी भूरू मारवे प्रवीण अडकणे दर्या बनसोड अशोक खोब्रागडे प्रकाश दातार हरीश देशभर तार अष्टशील बोरकर निलेश शेगोकार सचिन वाचणे हिरालाल पांडे अशोक माटे महेंद्र बागडे राहुल बनसोड मच्छिंद्र भटकर सुनील इंगोले मुख्तार अहमद हरभजन सिंग विजयाताई घोडेसवार संध्या रामटेके नूतनताई वासनी ममता मेश्राम नंदा रामटेके परिसरातील शेकडो नागरिक या पाहणी दौऱ्यामध्ये सहभागी झाले होते बडनेरा मध्ये घेतलेल्या या पाहणी दौऱ्याबद्दल परिसरांमधून समस्त नागरिकांनी आमदार रवीना यांचे आभार व्यक्त केले.